म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक
दा. क्र.
१९५७

१९३ ७०२ स्थल १९५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पु नाव — कन्याविक्रयदुष्परिणाम नाटक
ले — मोरो वि शिंगणे
विष — नाटक

१९३
सं.क्र. ७०२

# कन्याविक्रयदुष्परिणाम

## नाटक

श्रीमंत सरकार गायकवाड ह्यांच्या
आश्रयाखालीं छापलेलें

# कन्याविक्रयदुष्परिणाम नाटक.

हें पुस्तक

**मोरो विनायक शिंगणे**

व

**बालकृष्ण बापू आचार्य**

मुंबईचा वृत्तांत, माझें प्रिय पुस्तक अथवा व्यवहार
दर्पण, यशवंतविजया नाटिका, सुलभप्रसूति,
ऋणविमोचन वगैरे पुस्तकांचे कर्ते.

ह्यानीं

**आर्य भगिनींच्या हितार्थ लिहिलें**

तें


मुंबईत

'शारदाक्रीडन' छा[illegible]ही आभारी आहोंत.


शके . . .च्या कामीं श्रीमत सरकार गायकवाड
संस्थान बडोदें ह्यांनीं जसा उदार आश्रय दिला तसाच ज्या

हे पुस्तक इ स १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणे रजिस्टर करून मालकांनी सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत

# प्रस्तावना.

आमच्या आर्य भगिनींची दुःखद स्थिति पाहून मनाला अतिशय वाईट वाटतें; तरी आपल्या हातून त्यांची ती स्थिति अंशतः तरी दूर करण्याचा कांहीं प्रयत्न झाल्यास करून पाहावा, ह्मणून आज बहुत दिवस आमच्या मनांत घोळत होतें, त्या आमच्या उद्देशाला अनुसरूनच प्रस्तुतचें पुस्तक तयार केलें आहे. ह्यांत कन्याविक्रयापासून कसकसे भयंकर परिणाम घडतात, दलाल किंवा मध्यस्थि लोक आपली तुंबडी कशी भरतात, मुलीचा विक्रय केल्यानें तिचे कसे हाल होतात व ह्यातारपणीं लग्न केल्यापासून किती तोटे होतात, इत्यादि गोष्टींचें चित्र काढण्याचा यथामति प्रयत्न केला आहे. शेवटीं व्याख्यान ह्मणून एक निराळा विषय जोडला आहे.

रावबहादूर हरिलाल एच् ध्रुव नवसरी येथील जज्ज, तसेच न्यायमूर्ति रावबहादूर महादेव गोविंद रानडे ह्या उभय न्यायमूर्तींनी हें पुस्तक वाचून आम्हांस योग्य सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे आम्हीं अत्यंत ऋणी आहोंत.

ह्या नाटकाचे प्रयोग विद्वज्जनाश्रितनाट्यामोदप्रसारक समाज नांवाच्या नाटक मंडळीनें रंगभूमीवर करून दाखविले ह्मणून त्या मंडळीचे आह्मी आभारी आहोंत.

हें पुस्तक छापण्याच्या कामीं श्रीमंत सरकार गायकवाड संस्थान बडोदें ह्यांनीं जसा उदार आश्रय दिला तसाच ज्या

ज्या इतर उदार, देशकल्याणेच्छू व आर्यभगिनींची विशेष कळकळ बाळगणाऱ्या अशा सद्गृहस्थांनीं द्रव्यद्वारा मदत केली त्यांची नांवें खालीं दिलीं आहेत:—

१ दिवाणबहादूर मणीभाई जसभाई.
२ शेट मुळजी जेठा.
३ मेसर्स सुंदरदास धरमशी आणि कंपनी.
४ ,, जीवनदास धरमशी. ,, ,,
५ ,, छगनदास आणि कंपनी.
६ शेट ठाकरशी मुळजी.
७ ,, मुरारजी गोकूळदास.
८ एक मित्र.
९ शेट मनमोहनदास दयाळदास श्राफ.
१० ,, प्रेमचंद रायचंद.
११ ,, मनोरदास त्रिभुवनदास वरजिवनदास.
१२ ,, वसनजी खिमजी.
१३ ,, हरीदास सुदरदास.
१४ ,, डायाभाई तापीदास वर्जदास.
१५ ,, जगमोहनदास वृंदावनदास भाईशेट.
१६ ,, गोवर्धनदास गोकूळदास तेजपाळ.
१७ रा. हरिश्चंद्र वासुदेव मुराजन.
१८ शेट केसरीचंद भाईचंद.
१९ ,, रामजी लखमीदास.
२० ,, जगमोहनदास द्वारकादास.

२१ वैद्य प्रभूराम जीवनरांस.
२२ रा. हरी रामचन्द्र वैद्य.
२३ शेट देवीदास प्राणजीवनदास मेहता.
२४ शेट लखमीदास नगीनदास श्राफ.
२५ ,, पुरुषोत्तम भगवानदास भानुशालि.

ह्या त्यांच्या दातृत्वाबद्दल ग्रंथकार त्यांचे अत्यंत ऋणी आहेत हें येथें प्रांजलपणें कबूल केल्यावाचून राहवत नाहीं.

शेवटीं आमच्या वाचकांस ह्या आमच्या कृतींत जे दोष आढळतील त्यांचा त्याग करून काहीं गुण शेष असल्यास त्याचें ग्रहण करून मूळ हेतूवर लक्ष द्यावें व प्रत्येक सूज्ञ गृहस्थानीं तनमनधनानें झटून कन्याविक्रयाची चाल मोडून ती अजिबात नाहींशी करून टाकण्याचा प्रयत्न करून आर्य भगिनींचे अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न करावा अशी त्यास आमची सविनय प्रार्थना आहे.

ग्रंथकर्ते.

# जाहिरात.

मुंबई—भुलेश्वरानजिक,

**वैद्य प्रभुराम जीवनराम ह्यांचें औषधालय.**

आर्यन—औषधें तयार करण्याचें उत्तम साधन त्याजवळ असल्याबद्दलचें त्यास पुणें व काठेवाड येथील प्रदर्शनात एक सोन्याचें पदक व उत्तम सर्टिफिकिटें मिळालीं आहेत.

प्रवासांत उपयोगी पडणाऱ्या अनेक रोगावर तात्का-लिक गुण देणाऱ्या औषधाच्या पेट्या.

टोखडी ( टिन् ) रुपये १०

लाकडी ,, १९

---

डाक्तर पोपट प्रभुराम एल् एम् एन्ड् एस्.

भेटण्याची वेळ—सकाळीं ६—९,

दुपारीं—१२—२

संध्याकाळी—६—८.

त्यानंतर रात्रीस पाहिजे त्यावेळीं भेट होईल.

---

# OPINION.

I have heard portions read from your 'कन्याविक्रयदुष्परिणाम नाटक' and I find it very interesting The subject has been very ably and instructively treated, and I think it deserves encouragement at the hands of lovers of literature and social reform.

(sd.) Harilal H Dhruv.

Judge, Nowsari.

# शुद्धिपत्र.

व्याख्यानांत जेथें जेथें विभुक्त शब्द आला आहे तेथें तेथें विधियुक्त, व पृष्ठ १०८ ओळ तेरावीमध्यें 'तर मदत' आहे तेथें ' तर द्रव्यद्वारा मदत ' असें वाचावें.

# कन्याविक्रयदुष्परिणाम नाटक.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

गाव—मुंबई.

स्थळ—गोविंदरावाचें घर.

पात्रें—गोविंदराव व ठमाबाई

**गोविंदराव**—( प्रवेश करून ) काय करावें? कांहीं सुचत नाहीं. मी जो जो ह्मणून प्रयत्न करतों व ज्या ज्या युक्ति लढवितों, त्या त्या सर्व फसूं पहात आहेत; कारण तो राङलेक हरभट मोठा वस्ताद आहे. तोच जेव्हा तेव्हां माझ्या कामांत आडकाठी घालतो. ह्मणे गोविंदपंतच कशाला हवे आहेत मध्यस्थ? पण बच्चा याद राख, ह्या गोविंदाशीं गाठ आहे. तो तरी काय करील? त्याला तर पैशावांचून कांहीं दिसत नाहीं. रोज त्याचा आपला शेंकडा चढतच आहे! पण हा असे शेंकडे चढविणार तरी किती? किती का चढवीना! मी तर सांगितलेल्या किंमतींत हें सधान जुळविणारच. मग कांहींही होवो, जरकां ती मुलगी दामूला मिळाली तर इकडली दलाली तर आहेच आहे. पण कबूल केल्याप्रमाणें शालजोडी, पागोटें व शेला हा तर आपला ठेवलेलाच! ( मिशांवरून हात फिरवून ) मग कोण माझा

डॉल? तें सोनेरी वॉच्, ती पुणेरी पगडी नि ते स्टॉकिंग बूट! एकदां कां हें संधान जुळलें कीं, मग ह्या गोविंदाला काय तोटा आहे? त्याच्या सर्व संपत्तीचा मालक नावाला मात्र तो, पण हा गोविंदा खरा धनी व उपभोक्ता होऊन बसलाच ह्मणून समजा! मग काय? आपणाला वाटेल ती चैन करून घ्यावी. (अमळ विचार केल्यासारखें करून) पण हें माझें मनोराज्य तेवढ्यापुरतेंच दिसतें. कारण ती रमाबाई ऐकेल तेव्हां ना! ती ह्मणे मी आपली मुलगी अमल्या थेरड्याला कधींही देऊं देणार नाहीं. नवऱ्याचेंमुद्धा ती ह्या कामीं ऐकत नाहीं ह्मणून ऐकलें आहे. मीही एक दोनदा तिच्यापाशीं गोष्ट काढून पाहिली, पण ती आपला हट्ट ह्मणून सोडीत नाहीं.काय करावें? कांहीं सुचत नाहीं. (आठवल्या सारखें करून) हां, बरी आठवण झाली. ह्या कामीं आपल्याला ठमीची मदत अवश्य घेतली पाहिजे करील तर तीच काम करील. बायका बायका जमल्या कीं, त्यांच्या ह्या सोयरिकीच्या गोष्टी निघायच्याच. तेव्हां ठमीला हाताशीं घेतली कीं, ती संधि पाहून ही गोष्ट काढील व ती एकदा मध्यें पडली कीं आपलें काम झालेंच' पण ती का दुसरी तिसरी बायको आहे कीं, ती शुष्काशुष्की काम करील ह्मणून—तेव्हा तिलाही कांहीं चारलें पाहिजे. हो पण, घेऊन घेऊन काय घेणार! घेईल पाच पंचवीस रुपये! देऊं झाल तेवढे फेंकून, आणखी काय! पण-छे! छे!! एवढी रकम का तिला द्यायची आहे' देऊं दोन

शर गुलाची थापा नि करू तिला गार. हें का कोणी मला शेकवायला पाहिजे? काम झालें कीं ठेवले तिच्या हातावर दच चार रुपये. तेवढ्यानें तृप्त न झाली तर ' देताहुं दि-ग्ताहु ' केलें कीं झालें! त्यांत काय आहे मोठेंसें? इतक्यात ठमी येते तिला पाहून ) या. या. ठमाबाई. अशा इकडे या. बसा.

**ठमाबाई**—गोविंदराव, तुमच्यापासून मला एवढा मान मिळो आहे कळलं. मी आपली—

**गोविंदराव**—छे. छे. हें बोलणें आपल्याला नाहीं गोड लागत. तुह्माला पाहिलं कीं, काय असेल कोण जाणे, मला मोठा आनंद होतो नि तुमचं आपलं तिसरंच. या अशा जवळ या—तुमच्या आमच्यांत भेद का काहीं आहे?

**ठमाबाई**—( जवळ जाऊन बसते ) मी आपली वाट आज तीन दिवस एकसारखी पहात आहें. ह्मटलं गोविंदराव आज येतील, उद्यां येतील, पण छे. ज्याचं नांव तें, पण मेला माझा जिव कसला वेडा, ह्मणून ह्मटलं आपणच जा-ऊन पहावं भेट झाली तर. कारण न जाणों एखादा राग-बीग आला असेल. पुरषाचं काय? अंमळ कांहीं झालं कीं आला राग. हो, ह्मटलं तशांतलाच कांहीं प्रकार आहे कीं काय तें पहावं ह्मणून मींच येथें आलें.

**गोविंदराव**—राग न बीग, आणि तो ह्या ठमाबाईवर! भलतेंच काहीं तरी!! ठमाबाई, खरेंच पुसाल तर, आज दोन तीन दिवसांत फुरसुद ह्मणून कशी ती मुळींच मि-

काली नाहीं. ह्या पेक्षा तुमच्या येथें न येण्याचें दुसरें काही कारण नाहीं.

**ठमाबाई**—कां बरं? कोठें कांहीं शिकारीचा लाट मारण्याच्या खटपटींत स्वारी गुंतली आहे वाटतं! एखादं आंगवस्तर तर नाहींना गळ्यांत पडलं?

**गोविंदराव**—काय तरी ह्या बायकांच्या कल्पना अचाट! ठमाबाई, हा गोविंदा तसा नव्हे बरें! तुमचा पहिला तर्क मात्र खरा आहे. आली आहे खरी आटळांत शिकार. तुह्मी मनावर घ्याल तर मात्र आपण कंबर बांधणार. कां, तुमची आहे का मदत मला. बोला पाहूं?

**ठमाबाई**—माझ्यानं देण्यासारखी असेल ती देईन हो मी तुह्माला मदत. पण, आधीं शिकार कसली आहे ती कळली पाहिजे.

**गोविंदराव**—तो हरभट तो. त्याची ती मुलगी तुह्माला बहुतकरून ठाऊक असेलच—

**ठमाबाई**—हो. आहे ठाऊक. बरें मग?

**गोविंदराव**—मग काय? तो दामोदरपंत तिच्या नादीं फार लागला आहे. ह्मणे बायको करीन तर गगूच करीन. पण ती रमाबाई ह्या कामीं नाक मुरडते येवढेंच नव्हे, तर त्याला आपली मुलगी देऊं देणार नाहीं ह्मणून साफ ह्मणते. ह्मणून ह्मटल जरा जाऊन पहा कांहीं संधान जुळवून नि आणा तिला ताळ्यावर.

**ठमाबाई**—गोविंदराव, तुह्मी एवढे विचारांत कसले प-

डला? हात्तिच्या. हें काम का ह्या ठमीला शिकावयाला पाहिजे? कांहीं नाहीं ह्मटलं तरी पाच पंचवीस असलीं कामें ह्या हातानीं सहज केलीं असतील? मग हें काम किनई माझ्या हातचा मळ आहे. हं हं ह्मणता तिला ताब्यावर आणतें, मग झालें कीं नाहीं? पण—

**गोविंदराव**—'पण' ची काळजीच नको. तुह्मांला खुश करायचं काम ह्या गोविंदाकडे आहे. फत्ते करा बस.

**ठमाबाई**—पहा हो गोविंदराव, मीं किनई तुमच्या भरवशावर राहतें. नाहीं तर—

**गोविंदराव**—अजून संशय आहेच ना?

**ठमाबाई**—बरें तर, येतें आता, पुढल्या कामाला लागलं पाहिजे, नि पुराणालाही पण जायचं आहे.

**गोविंदराव**—या. पण तिकडलें वर्तमान केव्हां कळेल? कसें तरी काम फत्ते झालेंच पाहिजे.

**ठमाबाई**—आतां त्याची काळजी मला. एक दोन दिवसात कळवितें. ( निघून जाते )

**गोविंदराव**—( आपल्याशींच ) हातीं घेतलेलें काम बहुतेक अर्धें तर झालेंच ह्मणायचें. ठमी स्वाधीन झाली आतां ती हें काम शेवटास नेल्यावाचून राहयचीच नाहीं. मला तिचीच मोठी भीति होती. नाहीं ह्मणती तर तिचें काय घ्या. कारण ह्या गार्जीनें दोन चारदा तिच्या हातावर तुरी दिल्या आहेत. असो. आता आपण पहिल्यानें दामोदर पंताला भेटावें हें ठीक. ( जातो )

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ–हरभटाचें घर

पात्र–हरभट व रमाबाई.

हरभट—( रमाबाई तांदूळ निवडीत बसली आहे तीस ) अग ए. आज आपणाकडे चार मंडळी येणार आहे. माज-घरात बसावयास घातलें आहेस का कांहीं!

रमाबाई–हवें तर घाला. मला त्याची थोडीच गरज आहे? तुमच्या कामाला मंडळी येणार. माझ्यासाठीं कांहीं यायची नाहीं. माझं खेटर जात आहे खटपटी करायला.

हरभट–ही सर्व खटपट तुझ्या करतां आणि तूंच जर असं करूं लागलीस तर कसें चालेल. पहा, तुला सुख व्हावं, तुझ्या अंगावर दोन दागिने चढावे, ह्मणून ना ह्या सगळ्या उठाठेवी मी करीत आहे? नाहीं तर ह्याच्यावाचून माझें काय अडलें होतें! कांहीं नाहीं तरी एक पैशाची पानसुपारी येवढ्या मंडळीला हवी लागेल. तेवढा पैसा व्यर्थ नाहीं का गेला. पण कोणी कांहीं करतो तें पुढच्या आशेनें करतो. तसेंच ह्मटलें, गेली तर शिंची एक दिडकीच जाईल; पण सधान जुळलें तर आज एक हजाराचा तोडा घरात नाहीं का येणार! मग त्याचे दागिने करून आंगावर घालशील नि हिकडून तिकडे नि तिकडून हिकडे मिरवशील तेव्हा कसें!

रमाबाई–अहाहा. दिवे ओंवाळावे! काय तरी! ह्मणे

माझ्यासाठीं ह्या सगळ्या खटपटी!! मला तुमचे ते दागिने नकोत नि तुमचं तें सुख पण नको. मी आपली आहें गरीब तशीच राहिलें तरी पतकरलें. पण मी आपल्या पोरीचं जन्माचं मातेर नाहीं हो करू देणार' काय ह्मणे तो थेरडा हजार रुपये देतो. नाहीं ह्मणे मी दीडहजार घेणार! !! असं करकरून किनई माझ्या पोरीचं नाव सगळ्या गांवभर झालं आहे. तिला तोंड सुद्धा बाहेर काढता येईना. सख्या सोबतिणी भेटल्या कीं, तिची फटूफजिती करतात. शेजारी पाजारी हंसू लागले. मला देखील एक दोघींनीं विचारलं कीं, काय हो रमाबाई, ' तुह्मी भिक्षुक ह्मणविता नि तुह्मी मुलीचे पैसे घेता ह्मणून सगळ्या गांवभर झालं आहे. खरं काहो हें! ' तेव्हां मला तर बाई मेल्यासारखं झालं. पण येथें आहे का त्याची कांहीं लाज?

**हरभट**—काय, काय ह्मणालीस? तो थेरडा आहे ह्मणतीस होय? त्याला नुकतें कोठें ३९ वें सरून ४० वें वर्ष लागलें आहे! पुनः घरचा सुखी असून जवळ थोडी माया ही आहे. तेव्हां ह्मटलें निघतील शें दोनशें जास्त तर पहायचे. मी ह्या विचारांत आहें नि हिचें आपले कांहीं तरी कुतर्क नि शास्त्रें मध्येंच येतात!! तें असो. पण तूं माझ्या ह्मणण्यास रुकार दे ह्मणजे झालें. पैसा काढणें माझें काम!

**रमाबाई**—मी एकदां सांगितलं ना तुह्मांला नि तुमचं आपलं पुनः तेंच! हें पहा—तुह्मी हल्या त्या लाडी गोडी-

च्या गोष्टी सांगितल्या नि पाहिजे तें केलं—माझ्या पायाशीं डोकं जरी फोडलं-तरी मी नाहीं हो, 'हो' ह्मणायची. जा मेलं, ह्मटलं पैसा घ्या कीं पोटांत आग घाला—त्याच मला काय? 'करी तो भरी' ह्मणतात ना, त्याचं प्रायश्चित्त तुह्मांला, मला काय त्याचं? ह्मणून कानाडोळा केला असता, पण त्या थेरड्याला नि मी आपली पोर देईन होय? माझी गंगू आंधळी पांगळी का आहे कीं कशी तरी कोणाच्या गळ्यांत घालीन! उं हु.

हर०—काय, काय ह्मणालीस? ऐकणार नाहीं होय? तुझी आतांशा जीभ फार लांब होत चालली. सांभाळ, गांठ माझ्याशीं आहे. दुसरा तिसरा नाहीं हो कोणी हा! मी नांवाचा हरभट आहें बरें? तुझी पण बरीच खोडकी जिरवीन एका क्षणांत. ह्मटलें बायको आहे. उगाच जरा अनुमोदन घ्यावें. पण पाहतों तों ती आपली माझ्या डोकीवर बसायला लागली!

रमाबाई—हवं तें करा. मी ह्मणून नाहींचा हो ह्मणायची नाहीं. (इतक्यांत ठमाबाई येते) या. या. ठमाबाई. आज फारा दिवसांनीं येणं झालं! अशी माया पातळ का करतां?

ठमाबाई—पातळ नाहीं नि जाड नाहीं. जी आहे ती आहे. उलट आतां जाडच होईल.

रमाबाई—मग अलीकडे आठ चार दिवसांत कुठं दर्शन नाहीं. बाहेरगांवीं का गेलां होतां?

ठमाबाई कुठें गेलें नाहीं कीं आलें नाहीं. पण मेली फुरसुद ह्मणून कशी ती मिळत नाहीं. खरंच सांगूं रमाबाई. ह्मटलं रमाबाईची आज फार दिवस झाले गाठ नाहीं ह्मणून कितीदां तरी येईन येईन ह्मणून यायला निघावं सुद्धां कीं मेलं काहीं तरी काम पुढें आपलं ठेवलेलच ! आजच पहाना ! केव्हांची निघालें पण येतां येतां हा वेळ झाला.

हरभट—अग ए, मग तूं माझें ऐकत नाहींस ना एकूण?

रमाबाई—मला नाहीं ठाऊक. माणसानं मेलं हजारदां काय सांगावं?

हरभट—बरें तर मग. तुला अशीच कोंडून ठेवतों तरच माझें नांव हरभट—( रागानें पाय आपटीत निघून जातो )

रमाबाई—ठमाबाई, काय सांगूं? आताशा किनई आमच्या येथें असा काहीं चमत्कारिक स्वभाव धरला आहे कीं बोलून सोय नाहीं. मनात भरेल तें खरं. मग कुणाचं दिखिल ऐकायचं नाहीं.

ठमाबाई—असंच असतं हो रमाबाई पुरषांचं. त्यांच्या मनांत जी गोष्ट एकदां भरेल तीच घेऊन बसायचे. बरं, तें असूं द्या. मेलं जन्मालाच लागलं आहे तं. पण आज गंगू नाहीं हो दिसत कुठें ?

रमाबाई—गेली असेल कुठें शेजारच्या सोबतीणींकडे खेळायला.

ठमाबाई—तिला आतां हें अकरावं सरून बारावं वरीस लागलं असेल नाहींका रमाबाई, आतां लगीन करून टाका

एकदांच. पोरींचं हें एक आईबापांवर ऋणच असतं, तें फेडल्यावाचून सुटकाच नाहीं. त्यात ह्मटल ह्मणजे आता अवकाश का कांहीं आहे? अगदीं गळ्याशीं पाणी आलं.

**रमाबाई**—ठमाबाई तुह्मी ह्मणतां तें सगळं खरं. मला नाहीं का तें कळत? मला तर आज वरीस दीड वरीस कशी ती पुरती झोंप सुद्धां लागत नाहीं. पण काय करूं? कुठ तसं स्थळ तर मिळाल पाहिजेना? शोधांत आहे, पण अजून तसं कांहीं कुठं आढळन नाहीं. तुह्मांला शोध असेल तर पहा. कारण तुमची ओळखदेख बरीच आहे. तेव्हां कुठ आढळल्यास कळवा मला.

**ठमाबाई**—माझ्या नाहीं कुठं आढळण्यांत. चांगलीं स्थळ वाटेवर का पडलीं आहेत? ज्याना मुलगे आहेत त्यांचा कोण दिमाख! पण मी तुमच्याकरता शोध करण्यात काडी इतकी देखिल आळस नाहीं हो करणार रमाबाई. तसंच एखाद स्थळ आढळलं तर सांगेन तुह्मांला (विचार केल्यासारखें करून) हो. पण बरी आठवण झाली. आहें हो एक उत्तम स्थळ! जोडा पण जोडा, असा दिसेल कीं ज्याचं नाव तें!!

**रमाबाई**—कोणतं हो स्थळ तें!

**ठमाबाई**—श्रीनगरचा बाळासाहेब ठाऊक असेल तुह्माला. त्याचा मुलगा दामू, फार चागला माणूस रमाबाई, काय सांगू! दामूला दिल्यानें गंगू सुखांत पडेल हो. असल स्थळ हातच घालवू नका. मञ मेली अशीकडे कोणत्याहि गोष्टीची आठवण कशी ती रहात नाहीं, त्यामुळें सोन्यासारखी जागा

फुकट जात होतीं! किती लाख माणूस तो दागू! बाळंभट थत्त्यानें तर त्याच्या दारची माती कमी केली आहे. पण मी आपल्या मगूच जुळेल तोंपर्यंत खटपट करून पाहतें.

रमाबाई—उमाबाई तुम्ही ह्मणतां तें सगळं खरं, पण बाई, मी नाहीं माझी मगू त्याला देणार. कुळ आहे, शील आहे, पैसा आहे, अडका आहे, सर्व काहीं आहे. पण त्याला काय करायचं. पोरीला गरीब तर एखादा नवरा मिळेल. पण ईश् बाई, मी नाहीं त्या थेरड्याला माझी पोर देणार.

उमाबाई—( हसत ) काय, रमाबाई तुम्ही ह्मणतां तरी काय? तुमच्या डोक्यांत हें वेड कुणी भरवून दिलं! तुम्ही समक्ष पाहिला आहे का तरी त्याला? अहो त्याला आताच कुठं पंचविसावं वरीस लागलं आहे! आपल्या लोकांच्या चालीप्रमाणें त्याचं दहा बाराव्या वर्षी लगीन झालं नाहीं येवढेंच काय तें! जग काय त्रिविध आहे. टवाळखोर लागेल टवाळकी करायला. ह्मणे तो ह्मातारा आहे. काय झालं जरा कुठं केसांना पांढुरकी मारली ह्मणून? केसांवर नि दातांवर काय आहे. आताशा तर १५ १६ वर्षांच्या देखील पोरांचे केस पांढरे होतात. मग ते काय ह्मातारे झाले? काय वेडे लोक तरी? रमाबाई, मी त्याची अगोदरच चौकशी केली आहे हो! मला देखिल असंच संशय आला ह्मणून थोंडोपंत पिंगळ्यालासुद्धां विचारलं. ह्मटलं असता त्यानें किनई मीठ मिरची लावून थोडं अधीकच वय सांगावं. कारण त्याचं न त्याचं मुळचेंच खडा-

हुक! पण तो ह्मणाला 'त्याचें वय असेल २२।२३ सीच्या आंत.' रमाबाई, तुह्माला वाटतं का कीं, ही ठमी भलत्याच कामात हात घालील ह्मणून!

**रमाबाई**—ठमाबाई, मी खर खुरं सांगतें. तुह्मी त्याच नाव देखिल घेऊ नका मजजवळ.

**ठमाबाई**--बरं बाई! तुह्मी माझ्या जिव्हाळ्याची माणस ह्मणून सांगितलं. तशात किनई गगू माझ्या मुलीसारखी ह्मणून वाटतं पोरीचं बरं व्हावं. आतां मात्र कांकूं करतां, पण एकदा जुळलं कीं पुरे. मग याल जाल. भेटी घाटी खाल नि जांवयांत गर्क व्हाल! मग ह्या ठमीला कोण विचारतं?

**रमाबाई**--मी जें एकदा बोललें तें कधीं ह्मणून फिरविणार नाहीं.

**ठमाबाई**—रमाबाई, मग माझ नाहींच का ऐकायचं? मीच मेली वेडी' ह्मणूनच ह्या तुमच्या गोष्टी ऐकायच्या. ह्या ठमीनं लग्गीन जुळवून दिलं नि कोणी दु खांत पडलं अस तुमच्या तरी ऐकिवांत आहे का! माझ बोलणं आज नाहीं रुचत पण पुढें पडतील हो आठवणी!! असो. जें होण असेल तें चुकायचं नाहीं. बसा तर रमाबाई, मी येतें बरं आतां. ( जाते )

**रमाबाई**—ठमाबाई, येतं जा बरं का. बोलण्याचा राग धरूं नका. ( ठमा गेल्यावर स्वतःशीच ) काय करावं, कांहीं सुचत नाहीं. काय माझ्या पोरीचं होईल कोणास कळे! चिंता करून तरी काय होणार आहे. विधिमन्त्रच

जर तसं असेल तर त्याला माझा तरी काय उपाय? घरच्या माणसांनीं तर शुद्ध कसायाचा धंदा मांडला आहे. आई जगदंबे, तू काय करशील तें खरं. माझा सर्व भरिभार तुझ्यावर आहे. ( जाते )

[stamp]

## प्रवेश तिसरा.

स्थळ—दामोदरपंताचें घर

पात्रें—दामोदरपंत व गोविंदराव

दामोदरपंत—( आपल्याशींच ) 'अतर्क्य महिमा तुझा' ह्मणून जें पंतानीं ह्मटलें आहे तें कांहीं खोटें नाहीं मनुष्य उगीच निमित्ताचा धनी आहे माणसानें निरंतर प्रयत्न मात्र करीत असावें. कारण 'प्रयत्नानीं परमेश्वर' अशी ह्मण आहे प्रयत्न केल्यावर सिद्धिदाता परमेश्वर आहे. पण एवढें मात्र प्रत्येकानें लक्षात वागविलें पाहिजे कीं, त्याच्या मनाची प्रवृत्ति नेहमीं चांगल्या मार्गाकडे असावी. पण ह्याच्याउलट वर्तन ठेवल्यास अनर्थ ओढवेल हें सांगणें नकोच. पण मी तर तसें कांहीं वाईट काम करण्यास प्रवृत्त नसताही माझ्या कामात मला अजूनही यश येऊनये हा केवढा चमत्कार! मला बायको मिळावी ह्मणून मी आजपर्यंत थोडे का प्रयत्न केले? किती मध्यस्थी घातले, यथाशक्ति पैसा देऊं केला, किती त्रास भोगीत आहे, पण तो हरभट सांगितलेल्या किंमतीत कबूल होत नाहीं. त्याचा

आपला प्रत्येक दिवशीं सैंकडा चढतच आहे; पुनः त्याच्या बोलण्याचाही ताळ नाहीं. आज एक भाषण तर उद्या दुसरें, मिळून कशालाही मेळ नाहीं! (उसासा टाकून) मीं जे ह्या कामीं प्रयत्न केले आहेत ते कोणाच्या बापाच्यानें सुद्धा होणार नाहींत! फार काय सांगू? ज्यांचीं मुखें पाहू नयेत त्यांचीं ह्या कामीं नानातऱ्हेचीं आर्जवें केलीं आहेत. पण कोणी तरी मायलेक उपयोगी पडावयाचा होता? हर हर! परमेश्वरा!! असा मी तुझा कोणता अपराध केला होता कीं, त्या तूं मला असा छळीत आहेस! देवा, नकोरे आतां अंत पाहूं. पण हें मीं काय करीत आहे? माझ्या हातानेंच ना ही कुऱ्हाड मी पायावर मारून घेतली? आजपर्यंत मला थोड्या का मुली सांगून आल्या, पण मी होऊन त्या नाकारल्या. गगूवर प्रीति बसल्यापासून मला तिच्यावांचून कांहींच दिसेनासें झालें आहे. अहाहा! तिची ती सलज्ज मुद्रा पाहून माझ्या मनाला जो आनंद होतो तो सांगून पुरवत नाहीं. तिचें तें हास्यवदन माझ्या डोळ्यांसमोर केवळ मूर्तिमंत दिसत आहे. तेणेंकरून ती मला केव्हां प्राप्त होईल असें होऊन गेलें आहे. पण, (रागानें) अरेरे! तो दुष्ट चांडाळ ह्याक्षणीं माझ्यासमोर असता तर त्याचे तुकडेन्तुकडे उडवून दिले असते. (अमळ विचार करून) अरे पण त्याला मीं काय म्हणून व्यर्थ बोल लावूं? मीं आपल्या दैवासच बोल लावला पाहिजे, कीं इतकी मेहनत करूनही मला ह्या

कामीं यश येऊं नये! पहाना, मध्यस्थी घातलेले गृहस्थ तेही आतांशा कोठें दिसत नाहींत सारांश, प्रारब्धानुसार सर्व गोष्टी घडून येतात, हें आतां अगदीं सिद्ध झालें असो. असा विचार कितीही केला तरी कांहीं होणें नाहीं. करिता गोविंदराव येत तोंपर्यंत स्वस्थ बसावें हें ठीक.
(इतक्यांत गोविंदराव प्रवेश करितो )

**गोविंदराव**—का रावसाहेब, कसें काय चाललें आहे?

**दामोदरपंत**—कोण, गोविंदराव—ओ हो, आपण केव्हा आलांत? या असे या.

**गोविंदराव**—काय राव, मी केव्हांचा जवळ येऊन उभा आहे तरी देखील तुह्माला दिसू नये अं. काय झालें तरी काय तुह्माला?

**दामोदर**—झालें आहे डोचकं! गोविंदराव. ही थट्टेची वेळ नव्हे. कामाचें काय झालें तें सांगा पाहू अगोदर?

**गोविंदराव**—कामाविषयीं मुळींच काळजी करूं नका. हा गोविंदा तुमचें काम फत्ते करून देईल तेव्हाच निश्चित राहील. एरव्हीं त्याला झोंप ह्मणून कशी ती लागावयाची नाहीं.

**दामोदर**—गोविंदराव, माझी स्थिति तुह्मांला ठाऊक आहे. लोकांत माझ्या नांवाचा एकसारखा बभ्रा चालला आहे. ह्मणे निवाळा ह्मातारपणीं लग्न करायचा! अगोदर आठवली मस्ती, आणि आता लागली लग्नाची हुरहुर. खरोखर, तुह्मीं मला पहिल्यानें ह्या खटपटींत उद्युक्त केलें नसतें तर खचीत सांगतों मीं ह्या कामांत मुळींच पडलों नसतों.

**गोविंदराव**—( मनांत ) मरेनास कां. मला तुझ्याशी काय करावयाचें आहे? मला माझ्या कामाची गरज. भटाची दक्षणा ताजी झाली कीं, मग नवरा मरो किं नवरी मरो. ( उघड ) पन, माझ्यावर तुमचा विश्वास आहे कीं नाहीं तें बोला पाहू अगोदर?

**दामोदर**—गोविंदराव, हें काय विचारतां? विश्वास——

**गोविंदराव**—मग असें का? हो, विश्वास असला तरच्या गोष्टी, नाहीं तर कोण जातो आहे ह्या खटपटी करायला? नि फुरसुद तरी आहे कोणाला? पण ह्या सगळ्या खटपटी तुमच्याकरिता.

**दामोदर**—एकदां सांगितलेंना माझा सर्व भरिभार तुमच्यावर आहे ह्मणून, मग तेंच तें वारंवार काय?

**गोविंदराव**—बरें, सागतों तर ऐका. तो सदाशीवभट जोशी तुह्माला बहुत करून ठाऊक असेलच. ता आहे त्या मुलीचा मामा. मीं त्याचा हात दाबला आहे कीं बच्चा, हें सधान जुळलेस तर तुला पन्नास रुपये हे ठेवलेच आहेत. तुह्मी उगाच बसा. कोणतीही गोष्ट करणें ती सवडी-सवडीनें केली पाहिजे. पण अमळ दम खा. मग पहा कशी मजा उडवून देतों आणि ह्या येत्या वैशाखाच्या शुद्ध चतुर्दशीला देतों लग्न ठोठावून तुझें. ओ हो! मग कोण तुमचा डौल. नवरोजीराव बसतील घोड्यावर आणि जातील सासुरवाडीस मोठ्या थाटानें, तेथें सासूसासरा येतील सामोरे. मग गोविंदराव राहतील एका कोंपऱ्यात.

**दामोदर**—( हर्षयुक्त ) असा जर प्रसंग आणला तर मुलांला माझ्या शेजारीं बसवीन मग तर झालेंना?

**गोविंदराव**—तर तर. ह्मणे बसवीन शेजारीं. पण आठवण तरी राहील का ह्या गोविंदाची. तें असो. पण रावसाहेब, मामा साहेब तेथें जाऊन सधान जुळवितील आणि मी त्यांस कबूल केलेली रकम?

**दामोदर**—देऊ रे त्याला. पन्नास रुपयाची काय बिशाद!

**गोविंदराव**—छे. छे. छे. तें नाहींरे बुवा चालायचें. उधारीचा धंदा येथें चालायचा नाहीं. उधार कूळ आणि कोथळींत धूळ. तूं मित्र तर खरा पण ह्या कामाला मागितल्यावाचून इलाज नाहीं. कारण, अशा प्रसंगीं पिशवीचें तोंड खुलें केलें तरच मौज. कजूपपणानें एखादे समर्थी संधान बिघडावयाचें देखील!

**दामोदर**—अरे पण उद्यां दिले तर नाहीं का चालणार? आतां जवळ नाहींत ह्मणून ह्मटलें.

**गोविंदराव**—छे छे, उद्यांची गोष्टच नको. तो कसला खट्याळ मामा. पहिल्यानें हातात रक्कम मोजून घेईल तेव्हां काहीं कोठें वर्तमान सांगेल. आणि तशांत तो मेहुणा कोणाचा! ह्यावरून नाहींका समजत कीं, तो कसल्या प्रकारचा मनुष्य असला पाहिजे तें.

**दामोदर**—एकुण आतांच हवेत पैसे तर. पाहतों तजवीज करून. करता काय? गरज आपल्याला. (आत जातो व पैसे घेऊन येतो व ते गोविंदरावाच्या स्वाधीन करतो.)

गोविंदराव–(मनांत) पन्नास रुपये तर हातीं आले. पुढें संधि येईल तसें पाहतां येईल. कोठचा मामा नि कोठचें काय! कसें झालें तरी येवढ्यानें महिना दोन महिने तरी (पोटावर हात फिरवून) ह्याची दखाती नाहीं. ह्याचें काम आलेंच तर बक्षीस तर घेईनच. पण तोंपर्यंत ह्याला अर्धा अधिक भुतला पाहिजे. नाहीं तर आपली काम करण्याची शिताफी ती काय! (उघड) दामोदरपंत, आतां तुमचें अर्धे काम झालेंच ह्मणून समजा! घेतों तर आतां आपली रजा. (असें ह्मणून निघून जातो)

---

## प्रवेश चवथा.

स्थळ–हरभटाचें घर.

पात्रें–अंबू, गोदू, गगू व ठमी.

(गगू व तिची सोवतिण झोंपाळ्यावर बसतात इतक्यांत अंबू येते.)

अंबू–गोदे तूं ये ग. आपण तरी बाई गाणीं ह्मणूं. ह्या मेल्या गंगूचं जेंव्हां पाहावं तेंव्हां असंच. कधीं ह्मणून नीट येऊन बसली आहे आणि गाणीं ह्मटलीं आहेत असें मुळींच मला आठवत नाहीं.

गोदू–वाहवाग अंबूताई, तूं तरी किनई मरीच आहेस हो. चुकलं कीं मुकलं ह्मणतातना तशांतलंच तुझें हें बोलणं. मघापासून गाणीं गाऊन आह्माला बाई आता कंटाळा आला आहे. तूंच हवीतर बैस ह्मणत. गंगूताई

चल आपण जाऊं आतां. हिला हवें तर बसूं दे नि म्हणूं दे एकटीलाच.

अंबू गोदुताई, माझ्या बोलण्याचा राग काग तुला आला. मी बाई स्वाभाविकपणानं बोलले. मला नव्हतं वाटलं तुला त्याचा एवढा राग येईल म्हणून. गगू तर बाई मोठी माणसं. ती हूं का चूं कांहींतरी बोलते आहे का?

गोदू–अंबूताई, एवढें मोठेंपण बाई नको काढायला. गगूनें ग तुझं काय केलं. मींच तिला म्हटलं आपण जाऊं चल, अंबूला काय ती बसली असेल घरीं रंगमहालात पानपट्या खात नि खाववीत.

अंबू -इश्श बाई, किती तरी हा वात्रटपणा, आम्हींच पानपट्या खातो, आणि तुम्ही नुसतीं तोंडेंच पहात असाल नव्हे?

गोदू–आमचं काय मेलं, तुमच्या सारखं का आहे. विडा कुटून बिटून द्यावा तेव्हा कोठें खाणं होतं. पण नें असो मेलं. पण कायग अंबू, तुला नाहीं काग कांहीं समजलं?

अंबू–मला नाहीं बाई कांहीं समजलं. तुला कांहीं ठाऊक असल्यास सांग.

गोदू–अग आपल्या गंगूचे सोयरिकीचं जमत आहे.

गंगू–तुम्हाला दुसऱ्या गोष्टीच नाहींत काग काढायला? तुम्हींतरी बाई मऱ्याच दिसता हो.

अंबू–ह्यांत ग काय आम्ही वाईट केलें?

गोदू–अग तुला नाहीं ठाऊक. असं बोललं म्हणजे आपण मुद्दाम त्या गोष्टी करायला लागावं.

गंगू—सख्यानों मी तुह्मांला खर्च मागनें ह्या गोष्टीपासून माझ्या जिवाला समाधान न होतां उलट त्रास मात्र होतो.

अंबू—हें बाई काहीं मी तुनये वेगळेंच ऐकतें. सोयरिकाचें नाव काढलं कीं पोरींना कसा मोठा आनंद होतो. आणि हिचं आपलं काहीं तरी भलतंच. मला तर बाई माझ्या सोयरिकेच्यावेळीं जो आनंद झाला होता तो सांगतां पुरवत नाहीं आणि समजुतींत आलेल्या मुलींना तसला आनंद होणं हेंही साहजिक आहे.

गोदू—अग तुझं ठीक होतं, तुह्मीं दोघेंही समवयस्कर होतीत.

अंबू—गोदुताई, तुझा राग न येईल तर विचारतें. आपल्या गंगूचं देखील तुमच्या सारखंच का आहे?

गोदू—अंबुताई, तूं तरी बाई बरीच लावून बोलायला शिकली आहेस. हो, तशांतलाच काहीं प्रकार आहे.

गंगू—मघां तुह्मांला सांगितलंना कीं ह्या गोष्टी तुह्मीं पुनः काढूं नका ह्मणून!

गोदू—अंबूताई, काय सांगूं, दैवाची गति मोठी विचित्र आहे. ईश्वर ठेवील तसं राहणं भाग आहे. दुसरं काय? माझेंच पहाना. माझ्या बापानें पैसे घेऊन मला दुःखसागरांत ढकलून दिलं नसतं तर तुह्मीं तरी अशा का बोलतां? त्यानें आपल्या पोटाचा खळगा भरला नसता तर मला हे दिवस कां आले असते. देवा! असला कसायाचा धंदा करणारास तूं कसा विसरतोस. अशा

लोकांस शेवटीं नरकवास भोगावा लागतो असें शास्त्रात ह्मटलें आहे तें अगदीं खरें आहे. हीच पहाना गंगू अगदीं तीळनीळ तुटते आहे. अन्न देखील सोडलं असेल वाटतं, कारण आताशा पाहेंनें तों अगदीं पांढरी फटफ-टीत होऊन कृश होत चालली आहे एवढें झालें तरी त्या मागाला तिची दया येते का.

अंबू—गोदुबाई, तूं कांहीं तरी बोलतेस हो. माणसांनीं करून का कधीं होणार आहे परमेश्वरानें कपाळीं लिहिलें असेल तें कधीं ह्मणून चुकायचं नाहीं.

गोदू—तू काहीं तरी माझी आपली समजून करतेस हो. तुझा बाप पहाना किती शहाणा तो. त्यानें तुला तुझ्या योग्य पति पाहून दिला ह्मणून तूं आज कशी मजा मारतेस बरं? नाहीं तर आमचं. कफाचीं भांडीं धुतां धुता पुरेवाट होऊन जाते.

अंबू—तें राहू द्याहो तुमच. मेली जन्माळाच लागली आहे ती कटकट. त्या गोष्टी काढून जिवाला मात्र अधिक त्रास होतो. पण, आधीं गंगूच्या सोयरिकीचं कोठं जमलं सांग पाहू?

गोदू—अहाग वेडे, अजूनही तुला कळलं नाहीं का? तरी बरं कीं, सगळ्या गांवात झालं आहे ह्मणून. 'सगळं मुसळ केरांत' ह्मणतात तशांतली गत. त्या श्रीनगरच्या बाळभटाच्या दामूला दिली हो गंगू.

अंबू—तो इतका का ह्मातारा आहे?

गोदू—तुझा मस्करीच का वाटते. अगदीं जंग म्हातारा आहे हो तो!

गंगू -सख्यानों मला असं दुखवून तुह्मांला बरं का वाटत ?

अंबू -हा वेडे असग काय ह्मणतेस. कांहीं काळजी नको करायला. परमेश्वर करील तर सर्व नीट होईल. ( इतक्यात अबूला घरचा गडी बोलवण्यास येतो )

गडी—अव वयनीबाय, वयनीबाय, वयनीबाय ह्यायेत का हथ ?

अंबू—( पुढें येऊन ) कोणरे, हा मेला रामा, राम्या कांरे आलास ?

गडी—अव काय सांगू तुमी कदवासी हकड बसल्या न तिथ शट वाकुळशी वाट बघत्यात्.

अंबू—आज हपिसातून लवकर रे येणं झालं ?

गडी—आन् मास काय ठाव.

अंबू—गोदुताई. गंगूबाई बसा बरं मी येतें. घरीं वाट पहायचं होत असेल. उशीर झाला तर उगाच तब्येत मात्र जायाची. ( जाते )

गोदू—जा बाई जा हो उगाच एक घटका फुकट जाईल. गंगू बस बर मीही जातें. मलाही शिव्यांचा सपाटा चालला असेल. ( जाते )

गंगू—घटकाभर सोबतिणी आल्या ह्मणजे जिवाला थोडसं समाधान वाटत. नाहीं तर कससच होतं. ( पाहिलेसें करून. ) तें कोण बर येतय. ठमी तर नसेलना. हो तीच

आता वटवट करून माझें कपाळ मात्र उठवील खचित.
( इतक्यात ठमी येते. )

**ठमी**—गंगूताई, आज बरी भेट झाली हो तुझी. मी येयाला निघालें, पण म्हटलं कदाचित् तूं सोनतिणीकडे गेली असशील खेळायला.

**गंगू**—नाहीं गेलें. रोज रोज काय आहे त्यांच्या येथें.

**ठमी**—त्यात काय आहे? उगाच घटकाभर करमणूक. दोन दिवस लहान आहेस तों जाशील येशील. एकदां दोन हाताचे चार हात झाले म्हणजे घर सोडून जायाला का मिळेल वारवार. एकदा संसार सुखाची गोडी लागली म्हणजे घर सोडून बाहेर सुद्धा जायाला बरं वाटणार नाहीं. संसाराची गोडी कांहीं तशीच आहे. एकदा का दामोदरपंताची राणी झालीस म्हणजे मग माहेरची आठवणसुद्धा पडणार नाहीं.

**गंगू**—ठमे. हें ग काय तूं असं भलभलतंच बोलतेस? माझ्या नाहीं कामीं पडणार हो असला वात्रटपणा. तू आपली आल्या वाटेनें जा कशी.

**ठमी**—अबब. किती तरी राग हा. जसं कोणी म्हणेल हिला नवरा नकोच अगदीं. मीही पण लहानपणीं असंच करीत होतें हो, पण सासुरवाशी झाल्यापासून माहेरचं नावसुद्धा घेवल नाहीं.

**गंगू**—त्याचें मला ग काय सांगतेस.

**ठमी**—पण गंगू हें पहा. तू माझी म्हणून तुला साग-

ण्याची गरज, नाहीं तर माझं तरी काय अडलं होत. तुझ न तुझ्या आईचं मन कुणी भेल्यानं भरवून दिलं आहे कोण जाणे? अग, दामूसारखा नवरा मिळण ह्मणजे पदरीं पुण्यच पाहिजे हो, उगाच नाहीं बर चागला नवरा मिळत.

**गंगू**—मला पुण्यही नको नी पापही नको. मीं आपली आहें ती बरी आहें. माझ्या दैवीं जें असेल तें होईल. तूंग का मध्येंच पचाईती करतेस.

**ठमी**—गगू. अग अस नको ह्मणूं. तुझ्या आईबापाची व माझी फार दिवसांची ओळख, त्यात तूं माझ्या हाताखा-लीं वाढलीस ह्मगुन तुझ कल्याण होईल त्यातच माझ हित आहे. व ह्मगूनच मी एवढ्या कळकळीनें सागतें.

**गंगू**—पण मला नाहीं तुझं बोलण रुचत. मग त्या कामी तुझा तरी हट्ट का?

**ठमी**—गंगू, अग तुला लहानाचें मोठ केलं त्याचं का हे उपकार फेडतेस? वाहवाग मोठीच शहाणी दिसतेस. आज काल पैसा कुठें आहे? तुझ्या दैवान जोर केलं ह्म-णूनच तूं त्याच्या पदरीं पडणार. दोन दागीने मिळतील. लोकांत मान प्रतिष्ठा मिळेल. पण तू सांगितलेलें काहींच ऐकत नाहींस त्याला मी तरी काय करूं.

**गंगू**—काय करूं? ह्या दगडावर फोड डोकं आणि कर एकदाचे दोन तुकडे कसे (असें ह्मणून निघून जाते)

**ठमी**—(स्वत शीच) अशानें ही मुळींच वळणीला या-यची नाहीं तर निव्वळ कपटानेंच फसविलें पाहिजे. (जाते)

---

## अंक दुसरा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

### प्रवेश पहिला.

स्थळ-हरभटजीचें घर.

पात्रें-हरभट व गोविंदराव.

हर०—( आपल्याशींच ) ज्याच्या पदरीं आज दोन मुली आहेत ते सुखी खरे. त्याच्यासारखा सुखी दुसरा कोणी नाहीं. चार चौघे पायाशीं येतात, घटकाभर राव-साहेब, दादासाहेब, नाहींतर निदानीच्यापाळीं भाऊसाहेब ह्मणून हांक मारल्यावांचून कधींच राहत नाहींत. त्याचा हेतु साधेपर्यंत ते कसे आमच्या अर्ध्या वचनात. अशा-वेळीं आमचें पारडें मात्र वर चढतच असतें. आह्मीं बोलूं तें अशावेळीं गरजवंत लोक मान्य करतात. तेव्हां अर्थात ज्यापाशीं दोन मुली आहेत त्यानें अशा संधीस निघतील तितके अधिक पैसे काढण्यास मागेंपुढें कां पाहावें! आधीं द्यावी भली मोठी रक्कम ठोकून, मग बाजारांतल्या एकाद्या सवद्याप्रमाणें ती हळुहळु उतरत उतरत आपणास हवी तितक्या बेतावर येते. समोरचा धनी शक्तिमान असलाच तर शेंसव्वाशें रुपये कमी सांगून कबूल करण्यास राजी होतो. पण, आमच्यासारख्यांनीं अशावेळीं अंमळ ल-गाम खेंचून धरली व तोही विशेष गरजवंत असला तर सांगितलेली रक्कम येऊन पडलीच पदरात. पण तोच ग-रीब असला तर करतो बरोबर आणलेल्या माणसांबरो-

वर कांहीं मसलत, व आह्मीं आपणांस एक दोन दिवसांत कळवूं असें ह्मणून जातो उठून. पुन: एक दोन दिवसांनीं येऊन काहीं मध्यस्थी घालून सदर्हु प्रकार चालू होतो, पण काहीं वळत नाहीं असें पाहून येतो ताळ्यावर. एकाद्या प्रसंगीं असेंही होतें कीं नवरा मुलगा बिजवर असला आणि मुलगीही त्याच्या मनासारखी असली तर उभयपक्षांकडील खर्चही करण्याचें कबूल करितो. आमचें काय! जिकडून आपल्या पैशास विशेष खार न लागतां दोन पैसे अधिक निघतील तें पाहायचें. मीं तरी तेंच ह्मणतों आहे. पोरीचं काहीं कां होईना. आपणाला पैशाशीं काम. हो, मुलींना ल्हानाचें मोठें करायचें तें काय उगीच. लोक ह्मणतात, कायहो, ह्मणे अमुक अमुक मुलींचा पैसा घेतो. आले मोठे शहाणे, ब्रह्मज्ञान शिकवायला. त्यांना असें विचारा कीं मूर्खानों तुह्माला एवढेंही समजूं नये काय कीं हाडांची काडें करून मुलींना ल्हानाचें थोर केलें. त्यांची शुश्रूषा ठेवण्यांत, त्यांस औषधपाणी देण्यांत जो हा एवढा पदराला खार लावून घ्यावा, तोही उगवून घेऊं नये अं! तेव्हा पैसा घेतला ह्मणून त्यांत काय गुन्हेगारी केली! त्यांत काहीं कोणाची चोरी तर केली नाहींना. देणारा राजी खुशी आहे, त्याला गरज आहे ह्मणून तो देतो, आह्मीं कांहीं बळेंच त्याच्या खिशांतले पैसे हिसकावून घेत नाहीं. मालाची किंमत घेतों, त्यांत काय कोणाची भीति आहे. मग असले बोलणारे लोक झक् मारतात. हो

गंगूला हें कितवें वर्ष असेल? ( विचार केल्यासारखें करून ) बारावें, अलबत बाराशें रुपये ठोकून घेतलेच पाहिजेत. मग नवरा मुलगा तरुण असो कीं ऐंशीं वर्षांचा थेरडा असो, त्याशीं आपणाला काय कर्तव्य आहे. आपली तुंबडी भरली कीं झालें. आईबाप जन्म देतात कर्म तर देत नाहींत, मग तिच्या प्राक्तनीं लिहिलें असेल तसें होईल. एकदां मुलीचे दोहोंचे चार हात करून दिले कीं आपण तिच्या ऋणातून झालों मोकळे. प्रारब्धानुसार सर्व गोष्टी घडत असतात. तीच पहाना त्या भिकंभटाची पोर त्या बाळंभटाला दिली आहे ती. त्याचें लग्न झालें त्यावेळीं तो साठ वर्षांचा होता, पण नुकतेंच मीं ऐकलें कीं त्याला नातुसुद्धां झाले. नाहीं तर ती त्या सदाशिवभटाची पोर, खाशा पंचवीस वर्षांच्या तरूण बांडाला दिली होती, दोघाचे ग्रहही मिळते आले होते, जोडतेंही नीट आलें होतें. सर्व कांहीं नीट पाहून केलें होतें, पण लग्न होतांच ती विधवा होऊन बसली. मग प्रारब्धानुसार गोष्टी घडतात हें ह्मणणें कांहीं खोटें नव्हे. तेव्हां आपण करतों हें ठीकच आहे. दामूनें जर एवढी रकम नच दिली तर देऊन टाकतों त्या तुकंभटाला. त्याचें कुटुंब नुकतेंच वारलें आहे. दीड हजार देण्याला तो तयार आहे, ह्मणून गांवात दाट वदता आहे. सधान मात्र एकदां जुळलें कीं मजा उडेल. दीड हजार हे तर झालेच, वर आणखी लग्नाचा खर्चही त्याजपासून ठोठावून घेऊं. एकूण परभारें पावणेतेरा, सगळे पैसे घरांत. हो हाच बेत

कायम. पाहतों गोविंदरावाची वाट आज संध्याकाळपर्यंत कांहीं जास्त देत असला तर ठीक. नाहींतर आपलें ठरलें तेंच खरें. ( इतक्यांत गोविंदराव येतो. )

**गोविंद**—नमस्कार, हरभटजी, नमस्कार.

**हरभट**—कोण गोविंदराव, केव्हां आलां. या असे या.

**गोविंद**—नाहीं, ठीक आहे, मी येथेंच बरा.

**हरभट**—मी बुवा आज आपली बरीच वाट पाहिली, पण कोठें सकाळीं येणें नाहीं झालें?

**गोविंद**—हरभटजी, आमचें काय? आह्मीं हजार वाघाना जामीन. आताशा तर मला मुळींच जेवायलासुद्धां कशी ती फुरसुद मिळत नाहीं. बोलावण्यावर बोलावणीं चाललींच आहेत. जो उठला तो ह्मणे माझें काम आधीं करा. ज्याचें काम लौकर न करावें तो भोंपळ्याएवढा फुगतो. ह्मणून माझी मात्र कशी अगदीं तारांबळ उडून गेली आहे. पण उपयोग काय? स्वार्थ ना परमार्थ. पैसे घेणारे घेतील, बायकोवाले बायको घेऊन बसतील आणि माझ्या हातीं कांहीं लागलें तर ठीक. नाहीं तर हेलपट्यावरी खासडे मात्र आमच्या पदरीं पडावयाचे. कां असेंच कीं नाहीं?

**हरभट**—तें जाऊंद्या हो! पण पहिल्यानें आमच्या कामाबद्दल काय केलें तें सांगा पाहूं?

**गोविंद**—( मनांत ) ह्याला अंत लागू देतां उपयोगी नाहीं. स्वारी मोठी वस्ताद आहे. काम झाल्यावर माझ्या हातावर

तुरी देण्याला हा कमी करणार नाहीं. ( उघड ) खरच सांगूं का?

**हरभट**—खरंच सांगूं का ह्मणजे?

**गोविंद**—हें पहा, हरभटजी, दामूला पुष्कळ सागून पाहिलें पण तो तिनशें रुपयांवर एक कवडीही देण्याला कबूल होत नाहीं. पण मी कसला, इकडून तिकडून दोन चार गुलाबी थापा देऊन जेमतेम साडेतिनशांवर आणला.

**हरभट**—काय! काय ह्मणालेत गोविंदराव. सगळे साडेतिनशें? झक् मारतो तो. त्याला जाऊन साफ सांगा कीं, एवढ्या रकमेंत काहीं वळायचें नाहीं ह्मणून. हजार रुपयांखालीं एक कवडीसुद्धां घेणार नाहीं. तीही पण तु-मच्याकरिता ह्मणून. नाहींतर इतर कोणी असला तर रुपये घेईन आधीं पधराशें मोजून तेव्हां मग कोठें साखर-पुड्याची गोष्ट. समजलेत गोविंदराव, जा जाऊन सांगा ह्याप्रमाणें. जबाब मात्र लवकर कळला पाहिजे हो. नाहीं-तर तो तुकंभट आज पंधराशें रुपये मोजायला तयार आहे. आमचें काय! दोन पैसे अधिक मिळतील तिकडे संधान देऊं जुळवून झालें.

**गोविंद**—( हसत ) काय ह्मणतां हरभटजी. तुह्मीं अ-सतां कोठें? ती जागा केव्हांच भरली. तिकडूनच हा मी आतां पेढे खाऊन आलों. सर्व तंत्रही ह्या गोविंदा-नेंच जुळवलें.

**हरभट**—( दचकून ) काय ह्मणतां, ती जागा भरली?

(मनांत) हरहर! आपले पैसे मात्र बुडाले; काय तरी नशीब. दुसरा तर कोणी आज एवढी रक्कम मोजायला तयार असेल असें दिसत नाहीं. हो, गरजेवांचून एवढी रक्कम कोण कशाला हातची घालवितो. आजमितीला गांवांत ठिकाणें होतीं तेवढीं सगळीं आटपून राहिलीं. कांहीं कोठें दिसत नाहीं. काय करावें, कांहीं सुचत नाहीं. परमेश्वर काय करील तें खरें.

गोविंद—कां हरभटजी विचारांत कसले पडलां. तिकडली कांहीं आशा होती वाटतं.

हरभट—नाहीं तसें कांहीं नाहीं. आपला उगीच—

गोविंद—नाहीं ह्मणा तुह्मीं, पण मला तर वाटतें कीं, कांहीं तसलाच प्रकार असला पाहिजे.

हरभट—गोविंदराव, तुह्मांला ह्या हरभटाची अजून पारखच झाली नाहीं. अहो मी का अशा हजार ठिकाणीं लक्ष देणारा माणूस. एकदां जें बोलणें झालें तें कायम.

गोविंद—कायम हें मी समजतोंच, पण रकमेचें कायम झालें का? नाहीं तर वेळेवर बखेडा घालाल एखादा.

हरभट—नाहीं नाहीं, तेवढें मात्र जुळत नाहीं अद्याप, तुह्मांला कितीदां सांगितलें कीं मी हजारांत एक पैसुद्धां कमी घेणार नाहीं.-बाकी बोललों तें कायम.

गोविंद—हरभटजी, पहा बुवा, चांगला विचार करा. दामोदरपंत एवढी रक्कम देण्याला मुळींच कबूल होत नाहीं, आणि तुमचा तर हा असा हट्ट. तेव्हां ह्मणतातना तशां-

तली गेत. काय तो घोंटाळा सगळा माझ्या जिवाशीं. इकडे आड आणि तिकडे विहीर असें मला झालें आहे. घरचें समजून कामास हात घातला तो त्यांत हें यश. तेव्हां पुढचें काय भविष्य तें तर दिसतेंच आहे. मला तरी एवढी काय उठाठेव पडली होती. पण ज्याला एकदां आपला ह्मटला त्याच्यासाठीं होईल तो प्रयत्न करावा हाच काय-तो मनांतला उद्देश. आणि तशांत गगूही वाढत चालली ह्मणून ह्मटलें एकदां कोठें तिचें जुळतें ह्मणजे ठीक झालें असतें.

हरभट–मुलगी वाढली त्याची काळजी तुह्मांला नको. निदान एक वर्ष तरी अजून काळजी करायला नको. इतक्या वेळांत एकादी तरी जागा होईल. एवढी समुद्रासारखी अफाट जात पडली आहे. हात्त्याच्या त्याला मी भितों आहें कीं काय. कोणीही परमेश्वराचा लाल उभा राहील आणि डोळे मिटून पंधराशें रुपये मोजून पोर घेऊन जाईल.

गोविंद–ठीक आहे. तुमची एवढी उमेद आहे तर मी तरी येथें काय बोलावें! मर्जी तुमची. येऊं रजा तर.

हरभट–यावं. ( निघून जातात. )

गोविंदराव–( पुनः प्रवेश करून ) हा हरभट काय समजला आहे. तो मला एकाद्या सामान्य मनुष्याप्रमाणें समजतो काय. ह्मणे हजारच रुपये घेईन. ठेवले आहेत तुझ्या

बापानें हजार रुपये. मीं जर खरा नांवाचा गोविंदा असेन तर तिनश्यांवर एक फुटकी कवडीसुद्धां तुझ्या हातीं लागूं देणार नाहीं. (जातो).

---

## प्रवेश दुसरा.

---

**स्थळ**– ठमाबाईचें घर.
**पात्रें**–गोविंदराव व ठमाबाई.

**ठमाबाई**—एवढा वेळ झाला तरी गोविंदराव अजून कां बरं येत नाहींत. हं समजलें, गेले असतील त्या हरभटाकडे. पण ते आज सकाळींच जाणार होते. काय बाई विलक्षण माणसं तरी. मीं आजपर्यंत असलीं माणसं कुठें पाहिलीं नाहींत. मेलीं पैशाकरितां प्राण देखील देतील. (इतक्यात गोविंदराव प्रवेश करितो )

**गोविंद**—ठमाबाई, कसें काय, संधान जुळतें आहे कीं नाहीं. रमाबाईचें काय ह्मणणें आहे.

**ठमाबाई**—कांहीं झालेंतरी आपली मुलगी त्या थेरड्यास देऊं देणारच नाहीं ह्मणून ती हट्ट घेऊन बसली आहे. बरं ह्मटलं पोर तरी खुशी असेल तर ती देखील दामूचें नांव ऐकलें कीं नाक मुरडते. मिळून दोन्ही कडून पंचाईतच.

**गोविंद**—मग आतां पुढें विचार.

**ठमाबाई** - विचार कसला. असें आहे तरी उद्योग का सोडून द्यायचा आहे. कांहीं तरी युक्ति लढविलीच पाहिजे. जातात कुठें, आज नाहीं उद्या येतील ताळ्यावर.

**गोविंद**—असेंच खरें. त्याशिवाय दुसरा उपायच नाहीं.

**ठमाबाई**—(कांहींसा विचार करून) तुह्मीं ( कानांत सांगते ) आलं लक्षांत आतां. असें केलं कीं झालच काम. जा आतां.

**गोविंद**—पाहाहो मीं तुमच्या भरंवशावर राहतों. जाऊं तर मग.

**ठमाबाई**—जा. तुह्मीं त्याविषयीं बेफिकीर रहा. (जातात.)

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—गटार यत्र.

**पात्रें**—रामभट व सदाशीवभट

**रामभट**—कायरे ए सदाशीवभट, आज राडच्या कोडे फार दिवस जाहले दिसत नाहींस रे. कोणच्या गडबडींत आहेस.

**सदा०**—तुला काय बुवा, काहीं आहे संसाराची काळजी. खुशाल दोनदां अन्नसत्रांत हात मारतोस. दुपारची तंबी ताणतोस व रात्रीस तमाशे ओडतोस.

**रामभट**—हो, काळजी काय ती तुह्मालाच. आह्मांला कांहींच नाहीं वाटतं.

**सदा०**—खरीच नाहीं. ह्याय थोडींच पोरबाळं पाठीमागें रडत आहेत. नाहीं तर माझ्यापदरीं दोन मुलं आहेत त्यांची तर कांहीं वाट लाविली पाहिजे. थोरला मुलगा आतां लग्नाचा झाला आहे त्या विवंचनेंत मी आहे.

**रामभट**—होईल हो लग्न. त्याची काय मोठीशी काळजी आहे. आपलीं भटाची पोरं. उपाशीं का मरायचीं आहेत. एकदां चौपदरी अडकवून बाहेर पडलीं कीं, झाली एक दिवसाची बेगमी. बरं तें असो. पण, सदाशीवभट तुमचा गणू कांहीं दोन अक्षरं पढला आहे का.

**सदा०**—शिकण्याचे नांवानें भोपळ्याएवढें पूज्य. सगळा दिवस खेळ. रात्रीचे तमाशे व नाटकें. मीं तरी काय करूं. बोलून बोलून अगदीं जीव थकला. आपले गुण ह्मणून तो सोडीत नाहीं. पण आहे मोठा चाणाक्ष. लक्ष देऊन बसला तर पाठ सपाटून करितो. गेल्या पांच वर्षांत सगळा रुद्र मुखोद्गत केला आहे.

**रामभट**—अबबब! केवढा तरी विद्वान तुमचा मुलगा हा. नाहीं तर मी केव्हांचा रुद्र शिकतों आहें तरी अजून मला पोथीवांचून ह्मणताच येत नाहीं. असो. पण आतां त्याचें लग्न तुह्मीं करणारच एकूण.

**सदा०**—हो. एकदा त्याचें लग्न करून टाकलं ह्मणजे मी त्याच्या ऋणातून मुक्त झालों मग हवें तें करीना.

**रामभट**—पण मुलगी कोणाचीं पाहिली आहे.

**सदा०**—अजून कांहीं कोठे जमलें आहे असें नाहीं. आहे त्या हरभटाच्या पोरीवर डोळा. पोर भली मोठी आहे. दोन दिवसांनीं घरातला हातभार उचलील. पण त्यात आहे थोडासा वादा. तो निघाला कीं जमलेंच.

**रामभट**—वादा तो कसलारे बुवा.

**सदा०**—काल त्याला भेटलों नी काढली गोष्ट. तेव्हां तो ह्मणाला. सदाशीवभट एक हजाराचा तोडा असेल तर गोष्ट बोला. मी दोनशांपर्यंत देण्याला खुशी आहें. तेव्हां एकदां तो आठशांचा वांदा निघाला कीं झालेंच काम.

**रामभट**—वांदा निघेल हो कसा तरी. पण आधीं दोनशें रुपयाची रकम तरी आहे का तुमच्याजवळ.

**सदा०**—पन्नासेक रुपये आहेत जवळ दक्षणे दुक्षणेचे. बाकीचे काढूं पैसा मारवाड्याकडून.

**रामभट**—मी ह्मणतों त्याचा जर राग येत नसेल तर सांगतों. हें पहा मारवाड्याचें कर्ज आणि कशाकरितां तर मुलाच्या लग्नाकरितां. तर मग दोन दिवसानीं पैसा जमेपर्यंत लग्न ठेवलं तर नाहीं का चालणार. मारवाड्यांचा पैसा काढलेल्या लोकाची कशी स्थिती होते ती नाहीं का तुह्मीं पाहिली. उगाच पोराचे डोक्यावर कर्ज मात्र करून ठेवाल. पहा बुवा रीण काढून सण करणें हें मला तर गोड वाटत नाहीं. मग तुमची मर्जी.

**सदा०**—हो तुह्मीं ह्मणतां तें खरं. पण जमेल तेव्हांची गोष्ट तेव्हां.

**रामभट**—चला तर मग, आपण त्या हरभटाकडे जाऊं. मीही त्याला दोन शद्ब सांगून पाहतों.

**सदा०**—चला तर मग. ( जातात )

## प्रवेश चवथा.

स्थळ—रमाबाईची खोली.

पात्रें—रमाबाई व गंगू

**गंगू**—आई, तूं तरी बाबांना कांहीं सांगून त्याचं मन फिरीव. मला सुख व्हावं असें तुह्मांला वाटत नाहीं काय. माझें लग्न होतांच वाईट व्हावं असंच जर तुह्माला वाटत असेल तर तेथें माझा इलाजच खुंटला.

**रमा**—गंगू, मला नाहीं का वाटत तुझं बरं व्हावं. तूं सासऱ्याहून माहेरीं यावं जावं. तुला दोन मुलं बाळं व्हावीं, त्याचे मी लाड करावे असं माझ्या मनांत फार आहे. पण काय सांगू, घरच्या माणसांचा स्वभाव कांहीं चमत्कारिक आहे. त्यांना पैशावाचून कांहीं दिसत नाहीं. बारासर्वें पंधरा केव्हां होतील त्याकडे त्याचे लक्ष लागलें आहे. माझ्याकडून जोपर्यंत तुला दामूला न देण्याचं होईल तोंपर्यंत प्रयत्न चाललेच आहेत. तूं कांहीं काळजी करूं नकोस समजलीस.

**गंगू**—आई, तूं बाबांना सांगून त्यांच्यापाशीं हट्टच धे. व त्याला देण्याचं जोंपर्यंत टळेल तोंपर्यंत पहा. तुह्मीं दुसरे ठिकाणीं कोठेंही द्या, पण तो—

**रमा**—गंगू, मला नाहीं का समजत कीं, समजुतींत आलेल्या मुलींना बरं वाईट काय तें सर्व कळतं. असं तुला ह्याताऱ्याला दिलेल पाहून मला तरी बरं वाटेल का.

[library stamp]

गंगू—बाबांना मी स्वत: सांगावं असं वाटतं, पण, मला बाई लाज वाटते.

रमा—बाळे, मी सांगेन हो त्यांना व वारंवार तर तेंच चाललें आहे हें तूं पाहतेसच. मग जास्त काय सांगू? आता फक्त त्यांच्या पायाशीं जीव देयाचं कमी आहे, बाकी सर्व झालं.

गंगू—तें तर मी पाहतेंच. पण तुझा आग्रह शेवटपर्यंत सोडूं नकोस. सोबतिणी माझी थट्टा करूं लागतात, उखाणे म्हणतात तेव्हां मला असं वाटतं कीं मरण येईल तर बरं, पण हें जिणें नको. मला तर आतां माझ्या जिवाचा कंटाळा आला आहे.

रमा—जा, अशी व्यर्थ काळजी करूं नको. देवाच्या दयेनं सर्व कांहीं नीट होईल. मला देखील रात्रंदिवस झोंप लागत नाहीं पण हें सांगायचं कुणाला. ( जातात. )

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**–विठ्ठलाचें देवालय

**पात्रें**–गोविंदराव, ठमाबाई, रमाबाई वगैरे.

( पुजारी विठ्ठलास आरती करीत आहे नगारा, तास, घंटा वाजविण्याचा सपाटा चालला आहे भक्तजनाची टाळ्या वाजविण्याची एकच घाई उडून गेली आहे बाहेर आधळे उभे असून भजनाचे अभंग म्हणत आहेत गवयाचें गाणें चाललें आहे. कोणी फक्त दर्शन घेऊन परत जात आहेत इतक्यांत पडदा उघडतो व ठमाबाई प्रवेश करिते )

**ठमाबाई**–( देवाला तांदूळ वाहून व हात जोडून झाल्यावर ) विठ्ठला, मायबापा, आई रखुमाई माझी लज्जा रक्षण करणारी तूं आहेस. माझ्या कामांत आजपर्यंत जसें यश दिलेंस तसेंच पुढेंही देत जा. मीं सर्वस्वीं अपराधी आहे. ( एकीकडे जाऊन गवयाचें गाणें ऐकत बसते )

**गोविंद**–(प्रवेश करून) फार दिवस झाले देवदर्शन घेतलें नाहीं तर आज जावें हेंच ठीक. ( देवळांत प्रवेश करितो ). नमस्कारादिक झाल्यावर गाणें ऐकण्यास बसतो. ( इतक्यांत–रमाबाई व गंगू ह्या प्रवेश करितात. )

**रमाबाई व गंगू**–( देवाला तांदूळ वाहून झाल्यावर नमस्कार करून बाजूला बसतात गाणें चाललेंच आहे इतक्यात– )

**भक्तजनांपैकीं एक**–पाहिलंत का गणभटजी, ती पहा ती कोण बसली आहे त्या खांबाजवळ.

दुसरा—कुठे कुठे दाखीव ( खिशातून चष्मा काढून व तो डोळयाला लावून ) कोणच्या खांबाजवळ रे चिंतामणभट.

पहिला—तो पहा दक्षिणबाजूच्या कोपऱ्यातील खांब, त्याजवळ बसली आहे ती.

दुसरा—खरंच गड्या. ती तिच्याजवळ बसलेल्या बाईची पोर असावी. किती तरी तें तिचें स्वरूप. लग्न नाहीं झालं वाटतं. गळ्यांत गळसरी नाहीं.

तिसरा—नसेल झालं. तुलारे काय तिच्या लग्नाशीं करायचें आहे.

पहिला—तसें नाहींरे. आपल्या मंडळींतली असल्यास चौकशी नको का करायला.

दुसरा—हो चौकशी केलीच पाहिजे.

गोविंद— ( वरील भाषण ऐकून ) काय तरी मंडळी विचित्र आहे. नसत्या गांवच्या उठाठेवी करितात. ह्या लोकांना विचारा तुह्मांला कांहीं दुसरा धंदा आहे कीं नाहीं !

ठमाबाई— ( रमाबाईजवळ जाऊन तीस ) रमाबाई, पाहिलंत का लोक मेले कसे टवाळ ते. एकसारख्या मेल्यांनीं गंगूच्या गोष्टी चालविल्या आहेत. तो पाहिलात का पलिकडच्या बाजूला बसलेला काय ह्मणतो तें.

पहिला—अरे चिंतामणभट, मी आतां बरोबर ओळखली ती कोणाची कोण ती. अरे तो कृष्णमंदिराच्या शेजारीं राहणारा व आपल्याबरोबर त्या दिवशीं लघुरुद्राला

रावसाहेब मुनसफाकडे आलेला व ज्यानें जेवणावर २९ लाडू खाल्ले होते, त्या हरभटाची ती पोर.

**दुसरा**—नाहीं बुवा, माझ्या नाहीं लक्षांत येत अजून. ( विचार करून ) ह हं ह, समजलों. तो तारापूरचा असेल. आहे ठाऊक. पण गणभट, तूं रे कसा ओळखिलास त्याला.

**पहिला**—हात्तिच्या, त्यांत रे काय आहे? तोंडवळ्या-वरून देखील ओळख पटूं नये ह्मणजे मोठेंच नवल!

**दुसरा**—मग आपल्या नारूविषयीं पहाना तजवीज करून.

**पहिला**—केली असती तजवीज. पण ऐकलेंस का? अरे ती अशक्त असून रोगी आहे ह्मणून सगळ्या गावभर झालं आहे. आणि ह्मणूनच तिला कोणी वरण्यास धजत नाहीं.

**ठमा**—ऐकलत का रमाबाई, गावात काय चाललं आहे तें? काय मेले लोक तरी! नाहीं नाहीं तीं कुभाडें उठवितात!

**रमाबाई**—मी तरी काय करू बाई! लोकांच्या तोंडावर हात का देववतो? काय मेले टवाळखोर लोक तरी? नसत्या गांवच्या उठाठेवी! मारत्याचा एक वेळ हात धरवेल पण बोलत्याचें तोंड कोणी धरावं? मेले करीत ना कां हवी ती बडबड. माझी गंगू कांहीं तशी नाहीं. मग मी कशाला भितें.

**ठमा**—खरंच बाई. पण आता उशीर आला. यायच ना घरीं!

**रमाबाई**—हो चला. (जातात.)

**पहिला**—मुलगी खरोखरच मोठी वाढली आहे.

**गोविंदराव**–(पुढें येऊन व त्याच्या हातावर टाळी देऊन,) व. शाबास तुमची, काम तर चांगलें केलेंत. असेंच सर्वतो-मुखीं होईल असें करा ह्मणजे झालें. मित्र असावे तर असेच असावे. योजिल्याप्रमाणें लोकांतही गवगवा झाला. प्रत्यक्ष रमाबाईच्याही कानावर गोष्ट गेली. आतां हरभट-जीस सहज समजेल. ही गोष्ट ऐकून त्यांचे हातपाय गळ-ल्यावांचून राहणेंच नाहीं. अशी उमेद तर खचीत खचून जाईल. मग आपलें काम होण्यास आतां फारसा विलंब लागेल असें वाटत नाहीं. आतां घे ह्मणाव हजार रुपये! बरें पण आतां दामूची भेट घेतली पाहिजे. ह्यावेळीं तो घरींच असेल. तर आतां जावें हेंच ठीक. (जातो.)

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**–नारायणभटजीचें घर.

**नारायण**–( प्रवेश करून दुःखानें ) आमची दशा पुढें काय होईल ती एका भगवंतासच माहित. ह्मणे देशांतले सगळे व्यापार गेले, वेदविद्या तर बुडालीच ह्मणावयाची, सोवळें ओंवळें गेलें, आचाराविचारावर पाणी पडलें. एवंच सर्वत्र अनाचार प्रवृत्त झाला आहे. अशावेळीं मोठा व्या-पार ह्मटला ह्मणजे काय तो एकच उरला आहे; तो को-णता ह्मणाल तर, मुलीचे पैसे घेण्याचा बिनभांडवली व्या-पार! हा व्यापार शोधून काढणाराचेंही धन्य खरी. आतां,

ह्या व्यापाराला ह्मणावें तरी काय? हा सगळा गोंधळ आमच्या ब्राह्मण मंडळींत पहिल्याने सुरू होऊन त्याचें अनुकरण इतरांनीं केलें ह्यात नवल तें कोणतें? हो का नाहीं करणार? आह्मीं सर्व वर्णाचे गुरु ह्मणवितों आणि उपदेश मात्र करितों, पण आमचें वर्तन ह्या तऱ्हेचें. तेव्हां दुसऱ्यांना तरी काय ह्मणून बोल लावावा? परवां त्या रांडच्या पिलंभटाकडे झालं लग्न. आग्रह फार केला, ह्मणून गेलों लग्नाला. तिकडे त्यानें केला आग्रह, ह्मणे शास्त्रीबुवा, उठाच जेवायला, हो ना करतां शेवटीं उठावें लागलेंच. कसचें काय न कसचें काय, जेवायला बसलों मात्र, तों उलटी तयार! तें कन्याविक्रय करणाराकडचें दूषित अन्न माझ्या पोटात राहतें थोडकेंच! घांस घेतला कीं बाहेर आलाच. अजून सुद्धां आठवण झाली कीं ओकारी येते. (ओकूं लागतो) साफ ओकायला होतें तरी ठीक, पण तसेंही होत नाहीं. रांडच्याकडची दक्षणासुद्धां घेऊं नये. आणली एक चवली नि ह्मणे घ्या शास्त्रीबुवा ही दक्षणा. मी कुठला ती दूषित दक्षणा घेणार? टाकली तशीच नि धरला घरचा रस्ता. प्रायश्चित्याचें दर्शनसुद्धां नको. शास्त्रात सांगितल्याप्रमाणें समुद्राचे कांठीं जलोदर होऊन पडतील. त्याच्या कपाळीं तेंच आहे. सोंवळें ओंवळें तरी तेथें होतें का काहीं? रामाय तस्मै नमः पिलंभटा रांडच्या पोरीच्या पैशावाचून कायरे तुझें अडलें होतें. त्या हरभटाकडेही हीच व्यवस्था. तो रांडलेक एक हजार रुपये घेऊन बसला

आहे. हरहर! काय सांगावें. ह्या अशाच दुसऱ्या हुंड्याच्या दुष्ट चालीमुळें ती त्या रामभटाची पोर कालच्या दिवशीं पळून किहो गेली ह्मणून ऐकलं. काय करील बापडी. लग्नच नाहीं होत त्याला तिनें तरी काय करावें? रामभट बिचारा गरीब. त्यानें जांवयाला हुंडा द्यायला पैसा आणावा कोठून? रोज दहा सावकार बिचाऱ्याचे दाराशीं खेपा घालतात. कोठून हुंडा देणार. पोरीनेंही पाहिलें लग्न होत नाहीं. आणि त्यात तारुण्याचा भर. मग काय, गेली निघून! ही चाल पूर्वीं नसतां आतांच कोठून उत्पन्न झाली नकळे!! आमचा वेद किती पवित्र. त्यांत का ह्या अशा गोष्टी आहेत. पैसे देणारे किती तरी मूर्ख. रांडच्या पोरांनींच जर विद्या सोडून दिली आणि त्यांत लग्न कसें तरी एकदां झालेंच पाहिजे ही फार दिवसांची समजूत हाडीं खिळलेली. मग लोक पैसे न भरून तरी काय करतील. पण आमच्या वेदविद्येच्या पाठीमागें जर हे शख लागते तर असले घाणेरडे विचार कधींही त्यांच्या मनांत आले नसते. पण ती दिली सोडून नि लागले विंग्रजीच्या मागें. ती रांडची विद्या भिकारीच. तिनें का कोठें तेज येतें? त्या विद्येनेंच तर हा सगळा गोंधळ उडवून दिला आहे. आमचें कारटें तरी तसेंच नि-पजणार ह्मणून रंग दिसत आहे. असो. स्वस्थ बसून आ-युष्याचे दिवस अलिकडली मजा पाहण्यांत घालवावे हेंच ठीक. दुसरें काय. ( जातो. )

## प्रवेश तिसरा.

स्थळ—दामोदरपंताचें घर.

पात्रें—दामोदर व गोविंदराव.

दामोदर—(स्वत.शींच) हर हर! एका लग्नाच्या पायीं मी किती खराब झालों हें माझ्या जीवासच ठाऊक. आज काय, मामासाहेब मध्यस्थी पडले, द्या पन्नास रुपये. उद्यां काकासाहेबांनीं मध्यस्थी केली, द्या शभर रुपये. अशा नानातऱ्हेच्या गप्पा मारमारून गोविंदरावानीं तर मला हजार पंधराशें रुपयांस लोळविलेंच. आणखी हाताला हात लागेपर्यंत मला किती धुवून काढणार नकळे. तरी पण, गोविंदरावासारखा गृहस्थ मध्यस्थी पडला ह्मणूनच आपला कार्यभाग होईल असें मानण्यास थोडीशी जागा आहे. तो कसेंही करून त्या हरभटास वळणीवर आणल्यावाचून सोडणार नाहीं. पण, ती भया ह्मणजे आमची भावी सासूबाई—मोठी खट्याळ बायको आहे ह्मणून थोडिशी धास्ती वाटते. पण नको, त्याची काळजी मला नको वहायला. गोविंदा कसेंही करून काम फत्ते करील अशी माझी बालंबाल खात्री आहे. बरें, पण तो आज येणार होता पण अजून कां बर आला नाहीं?

(इतक्यात गोविंदराव प्रवेश करितो.)

गोविंद—दामोदरपंत काय सांगूं तुह्मांला, काम थोडक्यांत फसणार! काय लबाड लोक तरी!!

दामोदर—(आश्चर्यानें) फसणार? ह्मणजे याचा अर्थ!

[stamp]

गोविंद—तसेंच कांहीं कारण आहे. पण तें आतांच उघड सागून उपयोग नाहीं. दुसरें सर्व असो, पण मुलगी हातची जाणार हें ऐकून मला मोठें दुःख वाटतें.

दामोदर—अहो पण असें झालें तरी काय? मला नको घोटाळ्यात घालूं, सांगाच एकदाचे मीं तर बुवा अगदीं वेडा होउन गेलों आहे.

गोविंद—काय सागावें, तुमचें दैवच कांहीं विलक्षण आहे. जों जों प्रयत्न जास्त करावे व नव्या नव्या युक्ति लढवाव्या तों तों काम जास्त फसू पाहतें. तेव्हा तें तुमचें दैवच आड येतें असें ह्मटल्यावाचून राहवत नाहीं. एकंदरीनें पाहता तुमची लग्नघटिका कांहीं जवळ आली नाहीं असेंच ह्मणावें लागतें.

दामोदर—तें राहूं द्या हो. पण पहिल्यानें काय झालें तें सांगाल तर खरें. गोविंदराव, ह्या कामीं दोन पैसे जास्त पडले तरी बेहत्तर, पण कसेंही करून काम शेवटास नेलेंच पाहिजे. हो ह्मणतात ना घोड्यावर बसलें ह्मणजे एक लाथ काय नि दोन लाथा काय.

गोविंद—पत, काय सांगू, माझें कपाळ. तुमच्या कामा करितां मीं किती झटतों आहे हें तुह्माला ठाऊकच आहे, मीं ह्मणतों, ह्या कामीं मला त्रास पडला तरी बेहत्तर, पण, काम शेवटास नेल्यावाचून सोडणारच नाहीं. पण, करावं काय? मधून मधून कांहीं ना कांहीं तरी अरिष्ट आपलें उभें आहेच! तो श्रीगोंदेकर वचभट—तुह्माला ऐकून ठा-

ऊक असेलच त्यानें त्या मुलीची मागणी घातली आहे, एवढेंच नव्हे तर, तो एक हजाराचा तोडाही द्यायला कबूल आहे. आणि हरभट कोणत्या तऱ्हेचा मनुष्य आहे हेंही तुह्मांला ठाऊक आहे. त्याच्या कोणत्याच बोलण्याचा ताळ नाहीं. तेव्हा तो बोलल्या बोलाला फिरेल यांत काहीं नवल नाहीं. पण मध्यें थोडिशी अट राहिली आहे तेवढी पुरी झाली कीं त्याचें बहुतेक जुळलेंच. तेव्हां तुह्मीच पहा कीं आपलें काम शेवटास जाईल कसें? पण मी कसला आहे! पोरीला मी त्याच्या हातीं लागूं देणार होय? मध्येंच थोडेसें लिंबू पिळून दिलें कीं झालेंच. पण, ह्या माझ्या नुसत्या भुलथापीवर तो फसेल असें धोरण दिसत नाहीं. त्याची ही मोठिशी परवा नाहीं, कारण जातीनें पडला भिक्षुक, आणि भिक्षुक हे कसे एका अर्थासाठीं जीव देणारे. तेव्हां त्याच्या हातात थोडीशी जास्त रकम पडली कीं लागलेंच त्याचें मन फिरेल.छेः पण तेंही दुरापस्तच. कारण मुलगी चांगली सुदृढ, हुशार, गौरवर्णाची असल्याकारणानें त्याचें मन तिच्यावर फार बसलें आहे. पण,समजलें का दामोदरपंत,मी नावाचा गोविंदा आहे, त्याला देतों बघा कशी गुलाबी थाप. सांगतो तुला दुसरी मुलगी देतों पाहून. हिच्यापेक्षाही वयानें मोठी, सुंदर, गोरी गोरी पान आणि पुन थोड्या रकमेंत ह्मणजे देईल हिचा नाद सोडून. पण समजल का, हें एवढें कशासाठीं करायचें तें. फक्त आपलें मित्रत्व समजून आपल्याकरिता.

**दामोदर**—( हर्षानें ) हाँ रे यांच्या, त्यांत काय आहे मोठेसें. दोन पैसे जास्त लागतील. पण काम सोक्ष आणे उठलें पाहिजे. तुह्मी त्याला कांहीं कबूल केलें आहे वाटतें.

**गोविंद**—हो, कबूल केलें आहे तर, बरोबर शंभर रुपये आणून देतों ह्मणून सांगितलें आहे.

**दामोदर**—अबब्ब ! किती तरी ही रकम. गोविंदराव, हें आहे तरी काय ! तुह्मी माझें दिवाळें काढतां कीं करतां तरी काय ! अझून कशास कांहीं ठिकाण नाहीं तों भराभर तुमच्याच हातानें तुह्मीं किती पैसा नेला. सर्वस्वी नागवलों ना !

**गोविंद**—मग ठेवा बेत लग्नाचा. माझें त्यावांचून थोडेच तटलें आहे कीं मला त्यापासून कांहीं लाभ तरी. जाऊं द्या तर. द्या सोडून नाद. सांगतों बचभटला कीं हो कबूल, नि दे लग्नठोठावून येत्या वैशाखांत.

**दामोदर**—हें बोलता तरी काय तुह्मीं गोविंदराव, आणि मी केलेला खर्च सर्व फुकटच गेला नव्हे !

**गोविंद**—फुकट जाऊं द्यायचा नसेल तर द्या ही सांगितेली रक्कम.

**दामोदर**—( दुःखाने स्वतःशींच ) अरेरे !! मला काय ही बुद्धी सुचली आणि लग्न करायला निघालों. जो मी आजपर्यंत स्वतंत्र असून कोणाची एक पैसुद्धां लागत नव्हतों, तोच आतां त्या मारवाड्यांचा दास झालों आहे. बरं एवढ्यानें पुरे झालें ह्मणावें तर तेंही नाहीं. आज शं-

भर, उद्यां दोनशें अशी भर केलीच पाहिजे. एवढा नागवला गेलों तरी हातास हात लागला असता तरी त्याचें मला कांहीं वाटतें ना! पण अजून कशास कांहीं ठिकाण नाहीं आणि किती तरी रक्कम होऊन गेली. (उघड) हें पहा गोविंदराव, कबूल केलेल्या रकमेची अर्धी रक्कम द्या ह्मणजे झालें.

गोविंद—नको बुवा हा आंत बट्ट्यांतला व्यापार. एवढी मेहनतकरून कांहीं प्राप्ति नाहीं ती नाहींच. आणि बाकी राहिलेली पन्नास रुपयांची रक्कम गाठची घालूं ह्मणता. नको बुवा असला व्यापार मला गरिबाला. तुह्मीं बसाल घरीं आणि खासडे गोविंदाच्या कपाळीं येवढें कोणीं सांगितलें आहे मला. बरें येतों तर मग.

दामोदर—थांबाहो, जाल. एकूण शंभर रुपये दिलेच पाहिजेत तर मग. पहा हो माझा सगळा भरिभार तुमच्यावर आहे. एकदां का लग्न झालें कीं एक मजेची पार्टी तुमच्याकरितां मुद्दाम देणार आहे.

गोविंद—(मनांत)— ठाऊक आहे मला पार्टी देणारांचें तोंड! जवळ कांहीं रकम राहील तेव्हांची गोष्ट. ह्या गोविंदाला का असल्या लाडीगोडीच्या गोष्टी सांगणार तूं. लग्न होई तोंपर्यंत नागवून नाहीं टाकला तर मग कशाला पाहिजे. तुझा बहुतेक सगळा पैसा माझ्या खिशांत उतरवीन तरच मी नांवाचा गोविंदा. लग्न कोठें पडलें आहे लांब अजून. येव्हांच सावकार शोधण्याची पाळी येऊन तर चुकलीच. (उघड) मग ठीक आहे. अहो तुमचें बरें

त्यांत मला आनंद. तुह्मी आतां हलुहळु लग्नाच्या तयारीला लागाच. मग अगदीं वेळेवर भारी धावाधाव उडेल.

**दामोदर**—( पैशाच्या नोटी हातावर ठेऊन. ) पोहोंचले? माझें काम फत्ते कराच. आता हें काम माझें नाहीं तुमचें आहे बरं का गोविंदराव. ( जातात )

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ**–ठमाबाईचें घर.

**पात्रें**–ठमाबाई व गोविंदराव

**ठमा**—( प्रवेश करून स्वतःशींच ) मेल्या बायकाचें जिणं व्यर्थ. त्याना पुरुषासारखी स्वतंत्रता तरी आहे का? सर्वस्वी त्याच्यावर अवलंबून राहायच. त्यानीं ह्मटल उठ तर उठायच, बस तर बसायच. एवढेही असून जर नवरा तरणा योग्य असला तर सर्व सुख, आणि तोच जर का ह्मातारा असला तर त्या दुःखाला पारावारच नाहीं. बापानें जर पैसे घेऊन मला ऐशीं वर्षांच्या थेरड्याला दिल नसत तर मी तरी का आज अशी असतें? लग्नानें मात्र सुख भोगलें. पण संसार सुखाचा काहीं तरी अनुभव मिळाला आहे का! एवढही असून, माग दोन पैसे ठेवण झालय ह्मणाव, तर रोज नाहीं ते धंदे करून पोट भरण्यापर्यंतची श्रीमती. हा दलालीचा धंदा पत्करल्यापासून मला किती तरी लोकानीं श्राप दिले असतील, माझ्या सारख्या

आज मी किती घरं केल्या असतील? पण आतां अशा गोष्टींची आठवण करून काय उपयोग. आधीं पोटाची तर सोय बघितली पाहिजेना? कोणी का फुकट घालणार आहे? ह्या मेल्या गोविंदानें पहाना मला कस दोनतीनदा फसवलन्, पण काय करू! जर त्याच्या नादीं पुन न लागेन तर पोट कसं भरेल? सारांश बापाचें मात्र मुलीपासून कल्याण होतं पण त्या त्याच्या नांवानें दगड फोडून वाईट चालीचें अनुकरण करतात. पण आता पश्चात्तापाची वेळ नाहीं. हातीं घेतलेलें काम शेवटास नेलेंच पाहिजे. ( इतक्यांत गोविंदराव येतात. )

**गोविंद**—ठमाबाई. का अशा विचारांत का?

**ठमा**—नाहीं हो. विचार कसचा, मला तुमचा धीर असतां कोणाची भिती आहे.

**गोविंद**—काहीं काळजी नको करायला ठमाबाई! माझी पूर्ण मदत आहे तुह्मांला. तें असो, पण आधीं मला फार तहान लागली आहे. थोडासा चहा मिळेल तर पहाना.

**ठमा**—हो, हो, आहे तर, चहा का नाही मिळणार तुह्माला. ( चहा आणून देते )

**गोविंद**—( चहा पिऊन ) आतां थोडीशी हुशारी आली. ( खिशातून काड्याची पेटी काढून चिरूट पेटवितो ) या ठमाबाई, या पाहू अशा जवळ. ( ठमाबाई जवळ जाऊन बसते ) ठमे हा देह मनोमनी मी तुला वाहिला आहे. तू मागशील तें सर्व मला कबूल. पण खरंच साग आपलं काम कोठपर्यंत आलें?

उमा—गोविंदराव, सांगतें, पण आधीं घरांत सामान नाहीं त्याचा काय विचार?

गोविंद—हा वेडे सामानाची का काळजी तुम्हांला काय पाहिजे सांग पाहूं. सांगतों तांदुळवाल्याला, दे एक पायली तांदूळ, १ टिपरी दाळ व अर्धी टिपरी कठोळ. मग तर झालें ना?

उमाबा०—अहो हे किती दिवस पुरणार?

गोविंद—पुरतील तितके दिवस तर पुरीव. मग पुढें पाहतोंच आम्हीं. तांदुळवाला तर कोठें गेला नाहींना? बरं पण सांग पाहू तूं कोठपर्यंत काम केलेंस तें?

उमा—( हर्षानें ) रमाबाई झाली आहे थोडीशी कबूल. पण अजून मन साफ नाहीं आणखीं जास्त थापा देऊन आणतें ताळ्यावर तिला!

गोविंदराव—हो असेच करून तिला ताळ्यावर आणलें पाहिजे. आपलें काम कसेंहीं करून साधलेंच पाहिजे. तुझी बिदागी माझ्याकडे लागली. तिच्याबद्दल तू अगदीं बेफिकीर रहा. कसें करून मे एकदांची तिला कबूल करून. ( घड्याळाकडे पाहून ) अबबब, बराच वेळ झाला. मला आता गेलेंच पाहिजे.

उमाबाई—या तर मग. मलाही पुराणाला जायचं आहे. ( जाते )

## प्रवेश पांचवा.

स्थळ–हरभटजींचें घर.

पात्रें–हरभट व रमाबाई

रमाबाई–( दाराजवळ उभी राहून ) ऐकलं का, आतां आपल्या गंगूच्या लग्नाचं नकाच माग घेऊ. सारे लोक छी थु करू लागले. परवा देवदर्शनाला गेलें होतें, पहातें तों तेथेंही गंगूच्याच गोष्टी. तशांत तिच्याविषयीं नाहीं नाहीं त्या कंड्या लोकानीं उठविल्या आहेत.

हरभट–अग, तूं ह्मणतेस तें सर्व खरें, मला ठाऊक आहे. पण मीं तरी काय करूं? तूंच पहा, एकदां हातचा बाण सुटला कीं, मग तो परत येईल का? मीं पाहतों आहें कीं जरा खेंचून धरलें तर कांहीं थोडें जास्त निवूं शकेल. पण, काय चमत्कार आहे. ह्या भलभलत्या बातम्या उठल्यापासून जास्त रक्कम देण्यास कोणी धजत नाहीं. उद्या खास काय तो जबाब देतों ह्मणून त्यांस बोलून सुद्धां चुकलों, तरी पण अमळ ओढून धरलें तर आणखीं कांहीं जास्त निघालें तर निघेल. पण, हें तिचें नशीबच आड येतें तेथें दुसऱ्यानें काय करावें?

रमाबाई–अजूनही पैशाचा लोभच धरायचा ना? गांवांत जो उठला तो ह्मणे पोर अशक्तच आहे. कोणी ह्मणे पांढरी फटफटीत झाली आहे, कोणी कांहीं आणि कोणी कांहीं ह्मणूं लागले आहेत, असें एक का दोन. ज्याला जें हवें

तें तो लागूं लागला आहे. तिचे ग्रहही मारक आहेत म्हणून सांगतात त्यामुळें तर तिला कोणी फुकट सुद्धा करूं इच्छित नाहीं. आणि येथें सुटला आहे पैशाचा लोभ. मला नव्हतें का वाटत कीं, आपली गंगू असल्या म्हाताऱ्याच्या पदरीं पडूं नये म्हणून. पण उपायच खुटला.

हरभट–अग कड्या उठल्या न हवें तें झालें, पण पैसा नाहीं ना कोणी आणून मोजीत? लग्नाचें काय? यंदा नाहीं तर पुढल्या सालीं होईल त्याचें काय मोठेंसें? एवढी काहीं वाढून नाहीं गेली माझी गंगू. अशी तूं घाबरतेस कां उगीच?

रमाबाई–तुमच्यापुढें बाई शर्थ झाली. हात जोडावे तुम्हाला. अजूनही डोळे उघडत नाहींत. पण पुढें पडतील हो आठवणीं! उद्यां लोक तोंडांत शेण घालतील त्याचें तरी कांहीं? अगदीं गळ्याशीं पाणी आलं तरी ह्याची म्हणून झोंप उडतच नाहीं!

हरभट–तुझी आपली ही नेहमींची काहीं तरी वटवट आहेच. अग अमळ दम तर धरशील. तुला मघा सांगितलें ना कीं, जरा लगाम खेंचून धरली पाहिजे, म्हणजे निघाले तर निघतील आणखी शेंपन्नास रुपये.

रमाबा०–आगलावा त्या तुमच्या पैशाला. मीं एवढा वेळ उरस्फोड केली ती एवढ्याच करिता का? ह्याचा आपला पैसा पुढें येतो. छातीवर का न्यायाचा आहे पैसा?

हरभट––पुनः आपलें तेंच. एवढें सांगितलें तरी तिची

ह्मणून समजूत होत नाहीं. बायका जात्या अडाणी असतात ह्मणून ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. काय विलक्षण तरी बायको. पैशाशीं काय करायचें आहे ह्मणजे? पैसा आहे तर सर्व कांहीं आहे. ह्या संसारांत हरएक बाबतींत पैशाशीं ऊठ आणि पैशाशीं बस. आणि हिचें आपलें भलतेंच, पैशाशीं काय करायचें ह्मणजे. मूर्ख कोठची. अग, दोन पैसे जास्त निघाले तर लग्नाला काय पाच पचवीस रुपये लागतील ते जाऊन तुला दोन दागीने नाहींत का जास्त होणार?

**रमाबाई**—मला नको ते तुमचे दागिने. आजपर्यंत केलें तेवढें पुरे झालें!

**हरभट**—अग मी नाहीं केले ह्मणून काय झालें. माझ्या बापानें तर केले आहेत. आज नाहीं ह्मणायला अर्ध्या तोळ्याची पोत, पाच वालाचें मगळसूत्र, दहा वालाचें फिरकीचें फूल, आणि दोन तोळ्याचे गोट, पन्नास रुपयाची नथ. एवढें असूनही जास्त पैसे आले तर सगळ्या पाच तोळ्यांची सरी ह्या ह्या गळ्यांत लटकावून देतों ह्मणजे मग झालें कीं नाहीं? ( इतक्यांत पोस्टाचा शिपाई येतो )

**शिपाई**— ( हातात लखोटा घेऊन नांव व पत्ता वाचतो ) हरभट सदाशीव शौचे आहेत का कोणी येथें?

**हरभट**— ( पुढे येऊन ) होय, माझेंच नांव हरभट.

**शिपाई**— ( लखोटा हवालीं करून निघून जातो )

अंक तिसरा.

हरभट— ( पत्र हातात घेऊन व अक्षराकडे पाहून. ) अक्षर तर थेट गोविंदरावाच्या अक्षरासारखें दिसतें. हो त्याचेंच हें अक्षर. ( पत्र फोडून वाचू लागतो )

॥ श्री ॥

वे. रा. रा. हरभटजी यास-सा. नमस्कार विनंति विशेष. मागें आपली माझी भेट झाल्यादिवसापासून आपल्याकडून काहींच वर्तमान कळलें नाहीं. तरी आज मी मुद्दाम आपणाकडे आपल्या भेटीस येणार आहें, आपण कोठें बाहेर जाऊ नये. ठमाबाईलाही बरोबर घेऊन येतों. लिहिण्यास दिलगीरी वाटते कीं रा. दामोदरपंत तीनशें रुपयांपेक्षां जास्त रक्कम मुळींच देऊं इच्छित नाहीं. तरी ह्याजविषयीं पुरता विचार करून मला आज संध्याकाळीं काय तो शेवटचा जबाब मिळालाच पाहिजे. नाहींतर नारायण बिन सिद्धेश्वर भट्ट सातारकर आपली बारा वर्षांची मुलगी वरील रकमेंत देण्यास तयार आहे. परतु आपणाकडून निकालाचा जबाब मिळाल्यावाचून त्यास काहींच निश्चयात्मक सागता येत नाहीं. करिता हें पत्र लिहून कळविलें आहे. आह्मी संध्याकाळीं निखालस येतों. पुढें आमच्यावर तुमचा बोल राहिला नाहीं. तशात तुमच्या मुलीविषयीं गावात नाहीं नाहीं त्या कंड्या, उठल्या आहेत. कळावें बहुत काय लिहिणें हे विनंति.

आपला,

गोविंदराव.

अग एकलस का हें पत्र. आतां काय करूं? आतां मात्र माझा इलाज खुंटला खचित्. अधिक पैसा मिळण्याची आशा आतां व्यर्थ आहे. असो. हरीच्छा तो काय करील तें खरें. पण गेला, पैसा गेला. काय करू? (ओळखल्या सारखें करून) हो पण अजून कोठें सर्वी गेली आहे? लग्नाच्या दिवशीं धरतों अडवून. चक्क सागतों, कीं टाका शंभर रुपये, तेव्हां घोड्यावरून वर उतरूं देईन. मग काय करतात. जातात कोठें. झक् मारून दिलेच पाहिजेत. नाक दाबल्यावांचून का तोंड उघडत असतें हे शंभर रुपये हातात पडले कीं, अडवितों दागिन्याकरितां. आपण सागु तितक्या रकमेचे दागिने नसले कीं, आणखीं मागतों दोनशें रुपये जास्त. मिळून कोठून तरी त्यांना द्यां नाहीं तर त्या रस्त्यानें अडवून पांच सातशें रुपयाची भर करून घेण्याला कमी करतों कीं काय? बरं पण, एवढ्याशा थोड्या रकमेंत कबूल व्हावें काय? छे! छे! झक् मारतात ते. नाहींच कबूल होत. काय होणार असेल तें होईल. कायग ए मी ह्मणतों असेंच कीं नाहीं?

**रमाबाई**—अजूनही डोकींतलें वेड जात नाहींना. पुरे झाले हे विचार. अहो आता कोठं जागा राहिली नाहीं. पोर वाढून गेली. जातीच्या बाहेर तर देतां येत नाहींना. आतां म्हातारा न तरणा. पोरीच नशीब पोरीबरोबर.

**हरभट**—बैस बैस. बायकाना काय समजतें? आमचा आह्मांला विचार केला पाहिजे.

**रमाबाई**—विचार करा कीं हवें तें करा ? मी ही आपली चाललें.

**हरभट**—उभी रहा अंमळ. ऐकशील तर खरें. तुझ्याही मनांत आहे, तर मग मीं तरी कशाला आड येऊं ( स्वतःशींच ) हिच्याही मनानें धाव घेतली एकूण.

**रमाबाई**—मी कोठें कबूल होतें पहिल्यानें. पण, पाहिलेंतना पोरीच्या संबंधानें लोक काय बोलतात तें. तेव्हां भला हिही तड नाहीं व तिही नाहीं कसें तरी कबूल करणें भाग आहे.

**हरभट**—अग पण, एवढी घाई का ? पुढल्यासालीं होईल. आज एवढा पैसा कोण मोजणार आहे. एवढी मोठी पोर वाढविली ती का एवढ्याच रकमेंत देण्याकारिता ? छे छे. मीं ह्मणून कधीं कबूल होणार नाहीं.

**रमाबाई**—( रागानें ) तुह्मीं कबूल व्हा, कीं नका होऊं. मी उद्या जाऊन सांगतें ठमीला आणि करितें लग्नाची तयारी. ह्या वैशाखाच्या पहिल्या चतुर्दशीला लग्न झालेंच पाहिजे, पुढें तिथी नाहीं व अस्त लागला ह्मणजे लग्नें ही होणार नाहींत. तेव्हां कसें तरी करून ह्या तिथीला लग्न उरकून घेतलेंच पाहिजे ?

**हरभट**—आता मात्र माझा नाइलाज झाला. तुलाच जर पैसा नको तर मग मीं तरी तेथें काय करूं ?

**रमाबाई**—किती तरी मेला पैशाचा लोभ हा ! काय मेलं माणसानीं बोलाव तरी. तुह्मी कबूल नसलां तरी बेहत्तर. तुह्माला काय, पोरीला तोंड बाहेर काढवत नाहीं,

**हरभट**–( नाइलाज झालेसें पाहून ) मग देतों तर जबाब संध्याकाळीं गोविंदाला. ( स्वतःशींच ) शेवटीं एवढ्या रकमेवर जमविण्याचें माझ्या कपाळीं यावेंना. हर ! हर !!

**रमाबाई**–द्याच. मी लागतें तयारीला. ( जाते )

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश सहावा.

**स्थळ**–माधवराव फडणिसाचें घर.

**पात्रें**–गोदू व अंबू

**गोदू**–अंबूताई, अग तुला आनंदाची बातमी समजली आहे का कांहीं ?

**अंबू**–नाहीं बाई, तुला कांहीं समजली असल्यास सांग.

**गोदू**–हा वेडे! अग सगळ्या गांवभर झालं तरी तुला ग कसं नाहीं समजलं ? मोठेंच नवल बाई.

**अंबू**–आमच्या येथें थोडंच डाकेचं काम होतं ?

**गोदू**–हेंच तें. जेव्हां बघावें तेव्हां तुझं आपलं घरच्या माणसाविषयीं बोलणं. मग केव्हां कांहींही विचारा. सरळ जबाब कसा तो मिळायचाच नाहीं.

**अंबू**–गोदूताई, तू रागावली काग मजवर. हवी तर मी क्षमा मागतें हो तुझ्याजवळ माझ्या बोलण्याचा राग आला असेल तर.

**गोदू**–हो. एवढी कांहीं क्षमा नको मागायला, नि मलाही राग पण आला नाहीं.

अंबू—मग सांग तर. तूं मघां ह्मणालेली आनंदाची बातमी.

गोदू—अग, आपल्या गंगूची सोयरिक झाली. आमच्या येथून तिकडे जाणं सुद्धां झालं होतं.

अंबू—खरंच का ग पण हें. मला बाई नव्हतं माहित. माझे नाहीं बाई कान ऐकत कीं. तो हजार रुपये देण्याला कबूल झाला असेल असं. आणि तो हरभट ही हजार रुपयात काहीं कमी करील ह्मणून.

गोदू—होय. तू ह्मणतेस तेंही काहीं खोटं नाहीं. पण. ह्मणतात त्या ठमीनें हें सर्व सूत जमवलं. ह्या खटपटींत तो गोविंदाही होता असं ऐकलं आहे. पण कायग अंबू, तुला वाटत का ती गंगू ह्या गोष्टीला कबूल होईल ह्मणून?

अंबू—अग ती कबूल झाली न नाहीं झाली ह्मणून त्याचें काय? तिला थोडकेंच विचारताहेत तिचा बाप करील तें खर बायकाचें मेलं असंच. परस्वाद्धिन जिण. देतील तिकडे जायच झालं.

गोदू—एकूण गंगू त्या ह्मातान्याच्या पदरीं पडली ह्मणायची.

अंबू—विधिसूत्रच तसं असेल तेथें कोणाचा उपाय?

गोदू—असो. पण आपल्याला उशीर बराच झाला. अंबू ताई, तर मीं येतें आता.

अंबू—चलबाई मीही जातें. सासूबाई रागावतील एकादवेळ.

( जातात )

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—दामोदरपंताचें घर

( मंडळी जेवायला बसली आहे व त्याचा लाडू, वडे, जिलबी वगैरे मागण्याचा सपाटा चालला आहे, कोणी श्लोक ह्मणत आहेत, कोणी ढेंकर देत आहेत, इतक्यात हरहर महादेव होतो व दोन ब्राह्मण प्रवेश करितात )

**पहिला**—कायरे बुवा, कसा काय आजचा जेवणाचा थाट होता. मी तर बुवा चापून पांच लाडू, दहा जिलब्या, व पांच वडे खाल्ले. आणखी ही जास्त खाल्ले असते पण रात्रींचें आहे अजीर्ण, ह्मणून हात जरा आटोपता घेतला. एकूण समारंभाचा थाट मोठा होता खरा.

**दूसरा**—एवढेंच खाऊन का फुशारकी मारतोस खरेंच विचारशील तर मी तुझ्या दुप्पट खाल्लें आहे. आणखी खाण्याला कांहीं कमी केलें नसतें, पण तो एक कोणी माझ्याजवळ बसला होता त्याणें एक लाडू घेतला त्याला अर्धाच खाल्ला, आणि बसला लोकांचीं तोंडें बघत. वाढप्यांची कांहीं कसर नव्हती, पण गाढवानें केलें काय कीं जेवायचें नाहीं तर नाहीं पण लेका खालीं तरी बघ तर तेंही नाहीं. येऊन जाऊन माझ्या पानाकडे पाही व हळूच हसे. तेव्हा मी जरा——

**पहिला**—मी जरा ह्मणून कां थांबलास. लाजलास होय ?

आरो.

**दुसरा**—आणखी काय? एखाद दुसरा कोठें लाडू जास्त जाता तो राहिला.

**पहिला**—बरें तें असो. पण त्या हरभटाकडचा समारंभ केव्हा होणार?

**दुसरा**—असेल कधीं तरी. पण कोण? त्या हरभटाकडे आणि मी जेवायला जाणार ह्मणतोस?

**पहिला**—आपण तर जाणार बुवा.

**दुसरा**—जाणार! आणि त्या पोरीविक्याकडे परवां कथेंत कन्याविक्रय करणाराकडचें पाणीमुद्धां ग्रहण करूं नये ह्मणून ऐकलेंस नाहीं का? मी तर कधीं जायाचा नाहीं बुवा. जा आणि दोषाला अधिकारी व्हा एवढें कोणी सांगितलें आहे.

**पहिला**—काय त्यानें मुलीचे पैसे घेतले?

**दुसरा**—घेतले ह्मणून काय विचारतोस? तुला शंकाच आहे वाटतें अजून.

**पहिला**—असें असेल तर आपणमुद्धां जाणार नाहीं बुवा! तें असो पण. कायरे त्या लग्नाच्यावेळीं गडबड कसली चालली होती?

**दुसरा**—हा खुळ्या, तुला अगदींच ठाऊक नाहीं तर. गडबड कसली ह्मणजे पैशाबद्दलची. तो हरभट ह्मणे पहिल्यानें पैसा मोजा तेव्हा मुलीला करीन उभी तादळाच्या राशविर. तो सगळ्या गांवचा लबाड गोविंदा तो आहे मध्यस्थि. होना होता होतां जेव्हां रक्कम पदरात पडली आणि दागि-

न्याच्या अटीबद्दल मागितलेले रुपये मिळाले तेंव्हां कोठें वराला मांडवांत घेतला. सांगतो काय, कीं असले लोक पैशाकरिता जीव देखील देतील. शास्त्रात सागितलेली गोष्ट कधींही खोटी होत नाहीं. पहाना किती अनर्थ ओढवला असता एक पैशाकरितां. बरं तें असो. मरत-नाका आपणास काय त्याचें. चला जाऊन जरा मामकुर्शी तरी करू.

पहिला—चला. मीही जातों. माझं पोट अगदीं तुडुंब भरलें आहे. ( जातात )

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ—दामोदरपताच्या घराचा दिवाणखाना.

पात्रें—गोविंदराव, दामोदर वगैरे

( नायकीणिचें गाणें चाललें आहे इतक्यांत एकामागुन एक मडळी येते )

**नायकीण**—( गाते )

**रामभट**—ओहो. आज राधाजीनें मोठी बहार उडवून दिली. किती तरी गोड ही आवाजदारी ?

**शामभट**—वः तें काय सागावें! याचा गाण्यांत पहिला नंबर आहे. ती तारा नायकीण देखील ह्यांच्यापुढें कांहींच नाहीं. आपण तर आज ह्या गाण्यानें अगदीं खुष होऊन गेलों बुवा!

**शामळशेट वाणी**—हमे तो घणा नायकण पायली हार्य

पण येच्यासारखा गाणार कवां बी नाय पायला. राधाजी ते नमच्या पेला लावणी फेर बोला. ते लई गोड लागते.

**राधाजी**—( लवून रामराम करते व पुन: पहिली चीज म्हणू लागते. ती ऐकून शामळशेट खुश होतो व तिच्या आगावर दहा रुपयाची नोट फेंकतो )

**चिंतामणभट**—आज येवढीं वर्षें कोंकणांत काढलीं पण असें रंडकोचें गाणें कधीं ऐकलें नव्हतें. माझ्या मनास फार उतरलें बुवा! एकदरींत मुंबईत मजा खरी. नाहीं तर तें आमचें भिकार कोंकण. धन्य असो दामोदरपताची, आज त्यांच्यायोगें ही मजा पहाण्यास मिळाली. ( इतक्यात गोविंदराव येतो त्यास पाहून राधाजी रामराम करते )

**दामोदर**—का गोविंदराव, आज येवढा वेळ कोठें अस्म झाला होता? वाट तरी किती पहावी बुवा तुमची? झटलं ह्मणजे तुह्मीं सर्वांपूर्वी येऊन मंडळीचा परामर्ष घ्यायाला पाहिजे होता.

**गोविंद**—हं हं हं कोठें नाहीं, निघालों होतों केव्हाच यायला, पण त्या भिकंभटाकडे अमळ उशीर लागला. ( राधाजीस ) का राधाजी आज बहार उडवून दिली पाहिजे, मंडळी गार करून सोडाल तरच तुमची शिताफी.

**राधाजी**—( हसते व गोविंदरावास रामराम करिते )

**गोविंद**—दामोदरपत, हें पात्र आज हातीं लागायची मोठी मुष्किल होती. आज स्वारी पुण्यास जायची होती पण मोठ्या शिकस्तीनें राहवून घेतली. करतां काय, तुमच्या करिता ह्या सर्व खटपटी कराव्या लागतात.

**दामोदर**—आमचें भाग्यच समजायचें.

( नंतर गुलाब पाणी व हार तुरे वाटण्याचें सुरू होतें व मंडळी पानसुपारी खाते )

**मारवाडी**—हमे तो बरी बणी नायकण पायली असील पण हे राधाजीचे बरोबर कोणीबी पुरतेस नाय. एक एक तान असा मारते के काय बोलायाची वार्ता नाय.

**राधाजी**—( एक दोन चिजा ह्मणून ) आतां रात्र बरीच होऊन गेली आणि त्यानून पहांटच्या गाडीला मला पुण्यास जायच आहे तेव्हां आपली रजा असल्यास गाणें पुरें करितें.

**गोविंद**—(मंडळीस उद्देशून) ऐकला का काय प्रश्न झाला तो.

**दामोदर**—सर्व मंडळीची इच्छा असेल त्याप्रमाणें होऊ द्या.

**गोविंद**—अहो आमची मर्जी काय घेऊन बसला आहात, यजमान आपण. तेव्हा आपल्याकडून फर्मास झाली पाहिजे. आमचें काय सात वाजेपर्यंतसुद्धा येथून हालणार नाहीं.

**दामोदर**—राधाजीला जायाचें आहे, आणि रात्रही बरीच झाली तेव्हा एकदोन चिजा ह्मणून आटपावें असें मला वाटतें.

**राधाजी**—( गाते )

**गोविंद**—( राधाजीस जवळ बोलावून ) तिची बिदागी करतो व ती लवून रामराम करून निघून जाते. ( जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

स्थळ—दामोदरपंताचें घर

पात्रें–दामोदरपंत, गंगू, गोविंदराव, मारवाडी वगैरे

( दामोदरपंत बिछान्यावर कळा देत पडला आहे व जवळ गंगू उभी आहे इतक्यांत पडदा उघडतो )

**दामोदर**—( खोंकत ) अग, असं काय करतेस. अशी जरा जवळ येऊन बसशील तर खरी. लग्न झाल्यादिवसापासून तू कधीं ह्मणून माझ्याबरोबर गोडीनें एक शब्द देखील बोलली नाहींस. (खोकतो व कण्हतो )

**गंगू**—बरी आहे मी येथेंच. काय बोलायचं असेल तें तेथूनच बोला.

**दामोदर**—मला येथून बोलता येत नाहीं. तुला जवळ आलेंच पाहिजे.

**गंगू**—मला जवळ बसून ऐकू येत नाहीं. तिकडून काय तें होऊं द्यां एकदांचं. नाहीं तर ही पहा मी निघालें घरात. माझ्यानें नाहीं रोज कटकट सहन करवत.

**दामोदर**—[ मनात ] शिव शिव! माझ्या बोलण्याची हिला कटकट वाटूं लागली अं! ( उघड ) पण तुजवाचून मला आतां चैन पडत नाहीं. तूं जवळ हवी आहेस.

**गंगू**—तुह्मीं पाहिजे तें बोला. मी कधीं ह्मणून जवळ बसायचीच नाहीं.

**दामोदर**—कां बरं? न बसायला काय झालं. मी का

वात्र विष आहे तर तुला माझी भीति वाटते! तुझ्याकरतां तर हा सगळा व्याप आणि ही सगळी खटपट, आणि तूच जर असं करूं लागलीस तर तुझ्यावांचून मला तरी अशा प्रसगीं कोण आहे. ( कण्हतो ) अमळ पाठींत तर दाब. हा पहा येथें वारा मारूं लागला. ( अयाया ) जरा शेक तरी.

**गंगू**—माझ्यानें शेकणेंही होत नाहीं कीं दाबणेंही होयाच नाहीं. मी तुह्माला साफ सांगतें कीं, असलें काम पुन मला कधींहीं सागूं नका व तें मीं साफ करणार नाहीं.

**दामोदर**—करणार नाहीं ह्मणजे' तुला केलेंच पाहिजे.

**गंगू**—मीं करणारच नाहीं. मला नाहीं तुमच्या आंगाची घाण सोसवत! आणि त्या कफाच्या मडक्याजवळ बसवत! डोचकें कसें अगदीं उठून जातें.

**दामोदर**—काय चमत्कार आहे! आज तुझ्याकरिता एवढा पैसा खर्च केला तो हीं तुझीं उत्तरें ऐकण्याकरितां होय?

**गंगू**—नव्हते खर्चायचे! मी थोडेंच सागितलें होतें खर्चायला?

**दामोदर**—अग, तसें नव्हे, तुला राग आला वाटत. मी आपला भोळेभावानें साहजिक ह्मणालों.

**गंगू**—साहजिक बोला कीं रागानें बोला मला तुमचे जवळ येण नाहीं.

**दामोदर**—एवढें सागितलें, लाडीगोडीनें बोललों, पण तिचें आपलं एकच. पहा, तूं माझ्या हातापायाला उपयोगी

पडावम ह्मणून मी माझ्या दौलतीची राखरांगोळी करून तुला केली. फक्त हजार रुपये तर तुझ्या बापाला दिले, मध्यस्थी लोकांनीं शेंकडों रुपये खाल्ले ते निराळेच. शिवाय दागिने केले त्यांतही बराच पैसा गेला. बरं तो कदाचित् गेला नाहीं ह्मटलं तरी चालेल, तरी अजून माझ्या कपाळीं गोविंदाची कटकट उरलीच आहे. एवढा मी तुझ्याकरिता झिजलों असतांही तूं माझा अंगिकार करीत नाहींस तेव्हां माझेंच दैव ह्मणायचें कीं नाहीं? (अमळ रागावून) पहा तुला मी बऱ्या बोलानें सांगतों. हा असला छत्तिसाचा आंकडा माझ्या अगदीं उपयोगी पडायचा नाहीं. तुझ्या मनात माझा अंगिकारच करणें नसेल तर तू एकदाच काळ कर. ह्मणजे शिंचा एकच त्रास!

**गंगू**—बरं आहे, तुमची इच्छा तशीच असली तर तसंही होईल. मेल्या बापानेंच जर आपलं पोट जाळलं नसत तर मला तरी आज कां अशी स्थिती प्राप्त झाली असती. सर्वस्वी मेल्यान माझा घात केला. चांडाळाला पैशावाचून कांहींच दिसलं नाहीं. संसारसुखाला मात्र मी आता मुकलें खचीत! ह्या असल्या नुसत्या मळमळीत सौभाग्याला काय करावयाचं आहे. (रडूं लागते) अशा ह्यातारपणीं लग्न करून अखेरी तुह्मीं माझ्या जन्माचं मातेरंच केलं कीं नाहीं?

**दामोदर**—(मनांत) आता हिला काय उत्तर द्यावें! हिचें ह्मणणेंही अक्षरशः खरें आहे. मला ह्या वयात कोणी सांगितल्या होत्या ह्या पंचाईती. मीच मूर्ख. (उघड) अग

एवढा का मी म्हातारा आहें. किंचित् खोकला उसळला आहे व कोठे कोठे वायुच्यायोगानें शूळ मारतो एवढेंच, बाकी मी काहीं म्हणण्यासारखा म्हातारा नाहीं. वेडी बायको कुठली! अलीकडे कोठे दोन वर्षांमागें हे पुढचे दात गेले पण हिरड्या इतक्या शाबूत आहेत कीं, भाजलेले चणे सुद्धाही हळुहळू चावतों आणखी जास्त तें काय पाहिजे?

गंगू—मी कुठं तुह्माला म्हातारे ह्मटलं! अगदीं तरणे आहा. पण उठण्याबसण्याला शक्ति नाहीं इतकंच.

दामोदर—(रागानें) बस बस, मीं तुझें जास्त बोलणं ऐकून घेण्याला मुळींच खुशी नाहीं. फारच शेफारली आहेस. नवऱ्याचा मान कसा राखावा हें तुला मुळीं समजत नाहीं. आईबापानीं हेंच शिकविलें आहे वाटतें! तीं शिंची भटें, त्यांना कर्मुच्या रीतिभाती. दक्षणा कशी मिळवावी किंवा लोकाचे घरीं पुरण्ये कसे झोडावे एवढें मात्र त्याना ठाऊक!

गंगू—खबरदार हो! माझ्या आईबापाचें नांव घ्याल तर. तीं तुमच्या येथें खायाला का आलीं आहेत?

दामोदर—घरीं नाहीं आलीं ह्मणून काय झालें! माझ्याच पैशावर चंगळ चालली आहे कीं नाहीं! काय हलकट बायको माझ्या तोंडी लागते. मला काय अवदसा आठवली आणि मी हें लग्न केलें! शिव शिव! पैशापरी पैसा गेला. बायको केली ती हीं अशी कृत्या मिळाली.

लोक छि थु' करूं लागले. मिळून सर्वस्वीं मी नाडला गेलों. कम्चे शिंचे गोविंदराव नि ठमी! काय शिंच्यानीं भुरळ घातली मला. घात केला माझा. फुकट नादीं लागलों त्याच्या. केव्हां तरी मजजवळून त्यांनीं पैसा उपटला. एका लग्नापायीं पांचसहा हजार रुपये फस्त करून टाकले तरी अजून त्याची वरदलाली आहेच. ती शिंची ठमी सगळ्या गावची कुटग, कसल्या गोडगोड गोष्टी बोलत, होती. पण मला हें सर्व ठाऊक असूनही मी त्याच्या नादीं लागलों तेव्हां त्याना तरी कशाला बोल लावूं. काय करावें काहीं—

**गंगू**—साठी न बुद्धी नाठी ह्मणतातना, तशांतली गत झाली आहे तुमची एवढं ठाऊक होतं तर झक् कशाला मारलीत? कोण जातं ह्यांच्या नादीं लागायला, उगाच कपाळ मात्र उठतं. (असें ह्मणून बोटें मोडून घरात जाते)

**दामोदर**-गेली शिंची एकदाची कपाद. काय शिंचीनें मघापासून एकसारखी बडबड लावली होती. बेशरम बायको कुठची? (इतक्यांत गोविंदराव प्रवेश करितो)

**गोविंद**—दामोदरपंत काय चाललें आहे. प्रकृति ठीक आहे ना?

**दामोदर**—ठीक आहे. आमच्या प्रकृतिला काय होतें?

**गोविंदा**—कां पंत, कबूल केलेली पार्टी कोठे आहे? लग्न झाल्याबरोबर विसरलेत वाटतें? आतां कोण ह्या गोविंदाला विचारतो. खुशाल संसारसुखात मग्न असाल?

**दामोदर**—कसचें संसार सुख न कसचें काय! लग्न केलें नसतें तरी बरें झालें असतें असें आता होऊन गेलें आहे. काय शिंची बायको मिळाली आहे ती केवळ कृत्या. भडाभड उत्तरें देते. फार काय सांगू! मजजवळ उभी सुद्धां रहात नाहीं.

**गोविंद**—असें काय भलतेंच बोलताहो तुह्मी! गंगू सारखी दुसरी गरीब पोर नाहीं. तुह्मी फार दैवाचे ह्मणूनच ती तुमच्या पदरीं पडली समजलेत!

**दामोदर**—तुह्मीं अगदीं चुकतां गोविंदराव. तिच्यासारखी कजाग बायको सगळ्या दुनयेंत नसेल. अहो आज कितीक दिवस तिची मी एकसारखी विनवणी करितों आहें पण ज्याचें नाव तें, माझा वारादेखील घेत नाहीं.

**गोविंद**—[ हसत ] छे हो, वेड्यासारखें काय बोलता हें. अहो ती अगदीं नवी पोर, तिचान् तुमचा नवीन परिचय, तेव्हा ती एकाएकीं तुमच्या जवळ कशी उभी राहिल. बायकाना काहीं भीड मर्यादा असते कीं नाहीं?

**दामोदर**—कसची नवीन न कसचें काय. तिला मी आवडत नाहीं हेंच खचित् तुह्मी तरी दोन गोष्टी सांगून पाहाना?

**गोविंद**—ठीक आहे, तें माझें काम. पण काय हो दामोदरपंत? आतां आह्माला कबूल केलेलें बक्षीस केव्हा मिळेल?

**दामोदर**—( मनांत ) अजून सुद्धां ह्याचें माझ्या मागचें

लोंढण जात नाहींना! गाढवानें मला साफ भुतलें. आतां ह्याला देण्याला पैसा आणूं तरी कोठून! देईन ह्मणावें तेथूनही पंचाईत. नाहीं ह्मटलं तर तेथूनही पचाईत. तेव्हां आता ह्याला युक्ति युक्तिनेंच फसविलें पाहिजे. पण तो केवळ माझ्या भुलथापांना भुलेल असें वाटत नाहीं.

**गोविंद**—का विचार कसचा चालला आहे. मनांतून टाळाटाळी करायची आहे वाटतें! पण खुप याद राखा एक पै सुद्धा सुटायची नाहीं. ह्या तुमच्या कामासाठीं मी काय मेहनत केली असेल ती एका परमेश्वरासच ठाऊक. रात्र पाहिली नाहीं. दिवस पाहिला नाहीं, तहान नाहीं, भूक नाहीं, असे श्रम केले तेव्हां कोठें तुमच्या दोहोंचे चार हात झाले. समजलेत रावसाहेब. एवढें करूनही आह्मांला टोलाच अ!

**दामोदर**—पण मीं नाहीं ह्मणतों का? तुमची मेहनत तशीच आहे माझ्या सर्व लक्षात आहे. पण खरोखर सागू गोविंदराव, आज तेवढी रक्कम मजजवळ मुळींच नाहीं. जवळ पैसा होता, त्याचा खर्च तुमच्या हातींच तुह्मीं केला. तेवढ्यानेंही पुरे झालें नाहीं. तेव्हा शेवटीं सावकार शोधावा लागला. असें आहे तरी हळुहळू तुमच्या रकमेचा निकाल करून टाकतों. आता दोन दिवस जास्त लागतील त्याची माफी करा.

**गोविंद**—( हसत ) मला गोविंदाला का ह्या उडवा उडवीच्या गोष्टी सागायच्या. मीं नाहीं हो अशानें फ-

सला जाणारा गृहस्थ. आधीं पैसा मग बसा. उधारिचा धंदा आपण करीत नाहीं.

**दामोदर**—काय, तुह्माला दोन दिवसही धीर धरवत नाहीं?

( इतक्यांत एक मारवाडी येतो )

**मारवाडी**—दामोदरजी घेरमा छे के. दामोदरजी ओ दामोदरजी.

**गडी**—सांगताय थोप- शेटला आत जाऊनशी.

**मारवाडी**— जा तुज्या शेटला बोल पुनम आला हाय ते तमाला भार बोलावने. ( इतक्यात गोविंदराव त्यास आंत बोलावतो )

**गोविंद**—केम शेठ, शुं छे, तमारी ने येनी कय लेवड देवड छे के?

**मारवाडी**—हाच तो. ( खातें काढूं लागतो ) पंधरशो रुपया लगनिने वास्ते लिधेला छे, आजी शुधी आपता नथी. बिजा एक बे वखत जोशुं नय तो वरी कोडनमां फर्याद माडशुं. हमे सारा माणस समजीने पैसा आप्या.

**दामोदर**—अरे पुनम्, असा ओरडतोस कशाला? तुझा हिशोब लवकरच चुकता करतों. काहीं भिऊं नको. मी आज एवढे दिवस आजारी असल्यामुळें तुझे दुकानीं येण्यास सवड झाली नाहीं. चार दोन दिवसात तुझ्या पैशाची भरपाई करून टाकतों, काहीं भिऊ नकोस जा.

**मारवाडी**—बर हाय, अमे चर दाडा धीर खायेल. पण पछे अमे खंचीत फर्याद माडेल ( मारवाडी जातो. )

**गोविंद**—( मनात ) काय रावसाहेबांचीं लचांडें आहेत तरी ! शेवटीं मारवाडी शोधण्यापर्यंत मजल येऊन ठेपली एकूण. आतां मात्र माझा पैसा मिळण्याची पंचाईत दिसते. तेव्हां त्याच्या तंगड्या त्याच्याच गळ्यांत घातल्यावांचून स्वारी ताळ्यावर यायची नाहीं. ( उघड ) दामोदरपत, एकूण आमच्या पैशाची वानवाच दिसते.

**दामोदर**—( मनात ) शिवा मारवाडी पहाना ह्याच वेळीं कोठून आला तो ! गोविंदराव, ऋणांत राहणारा हा दामोदरपत नव्हे बरं ? आता एवढें खरें कीं दोन दिवस मागें पुढें, हें मघां सागून चुकलोंच आहें. तुमचे उपकार मी कधीं विसरणार नाहीं.

**गोविंद**—( मनांत ) असें आहे काय ? ठीक आहे. तूं काय ओळखलें आहेस ह्या गोविंदाला ? ( उघड ) त्याची काहीं चिंता नाहीं तुमच्याकडचे पैसे जातात कोठें ? उगीच तुझाला आठवण मात्र दिली. बरें मी आता घेतों रजा. गगूविषयीं तुह्मी बेफिकीर रहा. मी उद्याच्या उद्यां देतों ठमीला पाठवून. ती सागेल तिला दोन गोष्टी. काहीं काळजी करायला नको समजलेत ?

**दामोदर**—गोविंदराव येत जा बरं का. घर तुमचें आहे. ( गोविंदराव गेल्यावर ) गेली एकदाची ब्याद. काय शिवा दम देत होता, पण मारवाडी पाहिल्याबरोबर झाला गार. असो. जरा जाऊन पडतों ह्मणजे तरी अमळ बरें वाटेल. ( जातो )

## प्रवेश चवथा.

**स्थळ**–गंगूची खोली.

**पात्रें**–गंगू व अंबू.

**गंगू**–अंबे तूं ह्मणतेस तें सर्व खरं! पण माझ्यासारखी हतभागी दुसरी कोणी नसेल. बापानं मला विकून आपलं साधन करून घेतलं. पण, माझ्या सुखाकडे कांहीं तरी लक्ष दिलं आहे का?

**अंबू**–तूं कांहीं तरी सांगतेस हो मला. आमचेकडून सांगायचं होतं कीं, अलिकडे दामोदरपंत मोठ्या मजेंत आहेत. बायकोला अगदीं कसा तो त्रास पडूं देत नाहींत. स्वयंपाकाला ब्राह्मण काय, घरात कामकाजाला गडीमाणसं काय, अंगावर दागिने काय, कपडालत्ता काय, अशीं एक का दोन, सर्व सुखाचीं साधनं एका बायकोकरितां त्यांनीं जमवलीं आहेत. बायकोला पाटावरून ताटावर व ताटावरून पाटावर बसण्याची मात्र कायती तसदी!

**गंगू**–काय तरी बाई सांगतेस हें? त्यांतून कांहीं खरं आहे, पण, त्याला काय करायचं आहे. बायकांना मुख्य जें पतिसुख तेंच जर नाहीं, तर, इतर सुखाना काय करायचं आहे?

**अंबू**–अस खरखुरंच जर असलं तर मात्र हें सगळं ऐश्वर्य असून नसून सारखच. गरिबी असली तरी पत्करली. पण आधीं मुख्य जें पतिसुख तें पाहिजे. तसं असून जवळ एक दोन मुलं आहेत व तीं बोबडे बोबडे शब्द बोलून इकडून

तिकडे व तिकडून इकडे पुढें पाठीमागं उड्या मारताहेत, असं पाहिलं म्हणजे मनाला जो आनंद होतो त्यापुढें सर्व सुखें तुच्छ वाटू लागतात; पण तोच जर मनासारखा पति नसला तर मग इतर सर्व सुखांना काय करायचं? म्हणतातना "म्हातारा नवरा कुंकवाला आधार."

गंगू—अंबूबाई, दुसऱ्याचीं मुलं बघितलीं म्हणजे मला असं काहीं होतं कीं विचारू नका. मला वाटतं मलाही अशींच मुलं व्हावीं, त्यांना आपण खेळवावं, भरवावं, आह्मी दोघांनीं बसून त्यांचं कौतुक पाहावं पण, नको तें, माझ्या कोठें कपाळीं आहे? (असें ह्मणून रडूं लागते)

अंबू—उगी रहा. रडूं नकोस! देवाच्या मनांत असलं तर सर्व काहीं ठीक होईल. असं दुःख करून कसं होणार? दुर्दैवानं तूं म्हाताऱ्याच्या पदरीं पडलीं आहेस खरी. परमेश्वरानं त्याला आयुष्य देऊन तुह्मीं दोघांनीं सुखानं नांदावं हेंच आमचं ह्मणणं आहे. दुःख करून कसं होणार!

गंगू—अंबू, खरंच ह्मणशील तर मला माझ्या जिवाचा सुद्धां कंटाळा आला आहे. काहीं देखील सुचत नाहीं. दिवसभर कससंच वाटतं. त्या कफाच्या मडक्याजवळ उभंसुद्धां राहवत नाहीं! इश् मेलं, आठवण झाली कीं ओकारीच येते. अंबे असा प्रसंग वैरिणीवर देखील न येवो!

अंबू—बाई, कपाळीं आलं आहे खरं, त्याला आता कसं करायचं. गोड मानून घेतलं पाहिजे. बैस बाई मीं येतें आतां. बराच उशीर झाला. (असें ह्मणून निघून जाते)

---

## प्रवेश पांचवा.

स्थळ–गोविंदरावाचें घर

पात्रें–गोविंदराव

(स्वतःशींच) आता दामोदरपंतापासून पैसा काढण्याची एक उत्तम युक्ति सुचली आहे ती लढवून पाहतों. सागतों त्या मारवाड्याला त्याजवर फिर्याद करायला. फिर्याद करूनही जर पैशाची भरपाई न केली तर तुरुगाची वाट दाखविण्याची भीति घालवितों ह्मणजे मारवाड्याचे पैसे भरण्यास कोठून नाहीं कोठून तरी तजवीज करून पैसे आणील व ते त्यानें आणले पैसे आपण पहिल्यानेंच त्याजपासून उपटावे. हो, हीच नामी युक्ति. मारवाड्याचे किती? दोनहजार रुपये. ते व्याजासुद्धां निदान बावीसशें तरी झाले असतील, त्यातून आपले पैसे सहज निघतील. तर आता जाऊन मारवाड्याला त्याच्यामागें लावावें. (जातो)

## प्रवेश सहावा.

स्थळ–दामोदरपंताचें घर

पात्रें–दामोदरपंत, मारवाडी, वकील वगैरे.

**दामोदर**– (सकाळींच उठून ओटीवर तोंड धुत बसला आहे इतक्यात मारवाडी बेलीफासह येऊन दामोदरपंतास कोर्टाचे समन्स लावून जातो) हर! हर!! काय हा प्रसंग! मी

जवळ दोन पैसे बाळगून होतों त्या माझी ही अवस्था व्हावी काय? तस्मात् विधिसूत्रच विचित्र आहे. त्याचा पार कोणास लागावयाचा नाहीं. मी लग्न करायला निघालों काय आणि हा प्रसंग मजवर गुजरला काय! त्या मारवाड्याला परवां येवढें काकुळतीस येऊन सांगितलें, तरी त्यानें आपलें कृष्ण कृत्य करायचें तें केलेंच. असो. आतां स्वस्थ बसून काय उपयोग? कोठें तरी तजवीज करून ह्याची फेड केलीच पाहिजे. त्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं. नाहीं तर बिनभाड्याची कोठडी पाहावी लागणार! आता तजवीज कोठें करावी? आज दोन हजार रुपये देतो कोण व जरी कोणी दिले तरी नुसते आंगावर देण्यास कोण धजणार! काहीं तरी तारण मागणारच. तें तरी काय द्यावें? माझा आहे एक गोफ सुमारें चार तोळ्यांचा तो व हिचे आंगावरचे दागिनें सर्व उतरून ते देऊं. त्या शिवाय आतां अन्य उपायच उरला नाहीं. मला ह्यातारपणीं ह्या उठाठेवी कोणी सांगितल्या होत्या. करावें तसें भरावें. आणखीं काय? (जातो.)

---

## प्रवेश सातवा.

स्थळ—गोविंदरावाचें घर

पात्रें—गोविंदराव व ठमाबाई.

ठमा—काय हो गोविंदराव! माझे पैसे आतां तुह्मीं

मला देणार तरी कधीं? तुमच्या गुलाबी थापांना मी किती तरी भुलावं? रोजच्या तुमच्या पाहाव्या तर नव्या नव्या-थापा! आज मात्र तुमचें मी काहींही ऐकायची नाहीं.

**गोविंद**—( खिशावर हात मारून रुपये वाजवितो ) ठमा-बाई, भितां कां तुह्मीं? हे पहा दोन्ही खिसे कसे गच्च भरून गेले आहेत. त्यांतून किती पाहिजेत ते बोला पाहूं?

**ठमा**—तुह्मी द्याल तितके मला थोडेच आहेत, पण हा थाट कोठ साधला?

**गोविंद**—आपला ( कानांत सांगतो ) अशा युक्तीनें नवीन कर्ज काढायला लावून आपले पैसे उगवून घेतले. नाहीं तर पुरे बारा वाजले असते.

**ठमा**—गोविंदराव—पण ह्याला शेट कोणता भेटला?

**गोविंद**—तो तिलकचंद मारवाडी. त्याच्याकडे बायकोचे सर्व दागिने गहाण ठेऊन पैसे काढले व जुन्या मारवाड्याची फेड करणार तोंच मी जाऊन आपली रकम ताजी करून घेतली. पैसे द्यायला. अरे बापरे, त्यानें केवढे आढेवेढे घेतले ह्मणून सांगूं! पण मी जेव्हां ऐकतच नाहीं असें पाहिलें तेव्हां टाकले पदरांत नी काय!

**ठमा**—एकून तुह्मी वस्ताद खरे गोविंदराव. बर, पण आता माझी वाटणी केव्हा देणार?

**गोविंद**—उद्या अगदीं खचित देईन. आताच दिले असते पण ज्या दिवशीं पैसा आणला त्यादिवशी घरातून काढूं नये ह्मणून वडील सांगत आले.

ठमा—पण पहा हो गोविंदराव, नाहीं तर फसवाल एखादे!

गोविंद—फसविण्याची ह्या गोविंदापाशी गोष्टच काढू नको. जा घरीं जाऊन स्वस्थ झोंप घ्या. (जातात)

---

## प्रवेश आठवा.

स्थळ—विष्णूपंताचा दिवाणखाना.

पात्रें—विष्णूपंत व अंबूबाई

विष्णूपंत—का, आज विडा घ्यायचा नाहीं वाटतें. जेवण झाल्यापासून एक सगळी घटका झाली विड्यावांचून बसलों आहें. वेळ मिळत नसेल त्याला तुह्मी तरी काय कराल? तरी बर! अजून मुलं बाळ झालीं नाहींत. तीं झाल्यावर मग मला दोन दोन दिवस विड्यावाचून काढावे लागतील असा रंग दिसतो.

अंबू—(गालांतल्या गालांत हसून) खरंच का माझ्याकडून एवढा उशीर झाला! माझ्याकडून एका पळाचाही वेळ होत नाहीं ह्मणून बरं, नाहीं तर, काय ह्मणता कोणजाणे? जेवण झाल्याबरोबर इकडचा विडा नि मग दुसरा काम धंदा.

विष्णू—राग आला वाटतं माझ्या बोलण्याचा?

अंबू—(हसत) मला तर बाई कधींच राग येत नाहीं आणि त्यात इकडच्या बोलण्याचा?

विष्णू—तर मग येथें येऊन बसा पाहूं आधीं

**अंबू**—(बसते) व दुसरा विडा करून देते.

**विष्णू**—खरेंच सांगतों. हा विडा खाल्ला कीं ह्याचा स्वाद काहीं विलक्षणच लागतो. ह्या हातात अमृत आहे वाटतें?

**अंबू**—(लाजून मान खालीं घालते) माझ्या हातांत जर अमृत असेल तर तें ह्याच पायांच्या कृपेनें असणार व आपली मजवर कृपा आहे ह्मणूनच तें आहे.

**विष्णू**—प्रिये, तूं ह्मणतेस तें खरेंच का? तर मग दे पाहूं एक (असें ह्मणून तिचें चुंबन घेऊं लागतो इतक्यांत दरवाज्याची कडी वाजते ती ऐकून) कोण आहे बाहेर?

**गडी**—मी तो. दामूदरशेट लय बेजार हायेत ह्मणूनशीं तथं तुमास्नि बलावलीन् हाय.

**अंबू**—(दचकून) कोणरे, दामोदरपंत काय? काय होत रे त्याना?

**गडी**—ते मम काय ठावं! पन वयनीबायनीं तुमास्नि हटकायला सांगलन्.

**अंबू**—तान्ह्या, तूं अगोदर जा. मी लवकरच येतें. एकाएकीं त्याना झालं तरी काय? मी परवाच्या दिवशीं त्यांच्या येथें गेलें होतें त्यावेळीं ते तक्याला टेंकून बसले होते. गंगूबरोबर आमच्या थट्टा मस्कऱ्या झाल्या. इतक्यांत काय झालं त्याला? बरा असो. नाहीं तर त्या बिचारीला बुडवील!

**विष्णू**—त्याला काय व्हायला पाहिजे? पिकलेलें पान

केव्हां झडेल ह्याचा काय नियम आहे? त्याला हें पंचाहत्तरावें वर्ष असेल नव्हे का ? ( अंबूस उद्देशून ) तुह्मांला जायचें असेल तर जा आपल्या चिटक्याबरोबर. मी मागाहून येतों.

अंबू—मी जातें तर. ( आतात )

---

## प्रवेश ९ वा.

—※—

**स्थळ**-दामोदरपंताचें घर

**पात्रें**—दामोदरपंत, वैद्य वगैरे

( दामोदरपंत बिछान्यावर निजला आहे, वैद्य जवळ बसला आहे इतक्यात पडदा उघडतो )

**वैद्य**-( दामोदरपंताची नाडी पाहून ) दामोदरपंत, आतां तुह्माला कसें वाटतें ? कांहीं खायाची इच्छा आहे का? थोडी पेज आणवूं?

**दामोदर**—मला आता अंमळ बरें वाटतें. पण वैद्यराज, मला काय झालें आहे तें सांगा पाहूं अगोदर ?

**वैद्य**— काहीं नाहीं. फक्त ताप आला आहे. ( स्वगत-शींच ) ' राजयक्ष्मा न जीवति ' ह्मणून वैद्यशास्त्र सांगतें तें खरेंच. ह्या सगळ्या चिन्हांवरून ह्याची सध्याकाळ निभण्याची मारामार दिसते!

**दामोदर**—वैद्यराज, माझे प्राण कासावीस होतात हो आता.

**वैद्य**—तुह्मी बरे व्हाल. कांहीं काळजी करूं नका.

**दामोदर**—तर मग चिंता नाहीं. नाहीं तर विनाकारण मी माझ्या कुटुंबाचा घात करून जाईन. वैद्यराज, आता मला माझ्या कृतकर्माचा पश्चात्ताप होतो. खरोखर पुरुषानें ह्मातारपणीं लग्न करणें ह्मणजे अत्यंत नीच व घोर कर्म आहे. त्याच्यासारखा अधम ह्या दुनयेंत दुसरा कोणी सापडणार नाहीं. तो दुष्ट, तो घातकी, तो चांडाळ, पण आता ती काय करील! उद्या माझा अंत झाला तर तिनें कोठें उभें रहावें? वैधव्यपंकात मी तिला व्यर्थ बुडविणार! पण कायहो वैद्यराज, मी आतांच मरणार नाहीं ना?

**वैद्य**—भलतीच काय बडबड चालविली आहे. थोडीशी पेज घ्या. ( दामोदरपंतास पेज पाजतात इतक्यात तो बेशुद्ध होऊन पडतो. )

**वैद्य**—( मंडळीस ) ह्यांचा नीट बंदोबस्त ठेवा. मी औषध पाठवितों तें द्या ह्मणजे जरा आराम वाटेल ( जातो )

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**--दामोदरपंताचें घर

**पात्रें**--पोलीस जमादार, गंगू, ब्राह्मण, वगैरे

( खिशातील बिननावी पत्र फोडून तें वाचतो )

**पो० जमादार**--'मेहरबान पोलिस कमिशनर साहेब बहादूर यास.--

गिरगावांत राहणाऱ्या दामोदरपंत नावाच्या एका ब्राह्मणाच्या गंगू नामक विधवेनें दोन दिवसांवर आपलें नुकतेंच जन्मलेलें मूल गोविंदराव व ठमी ह्यांच्या मदतीनें मारून गटारांत फेंकून दिलें आहे हें मेहरबानांस जाहिर व्हावें.'

**पो० जमादार**--हो. हेंच तें घर. ( दरवाज्याची कडी-वाजवून ) दरवाजा उघडा. कोण आहे घरांत ? ( एक ब्राह्मण बाहेर येऊन )

**ब्राह्मण**--काय आहे ? ( जमादारास पाहून घाबरतो व लटलटा कापूं लागतो )

**जमादार**--ह्या घरांत कोणी गंगूबाई नावाची दामोदरपंताची विधवा राहते काय ?

**ब्राह्मण**--( कांपत कांपत ) कां बरें ?

**जमादार**--( दमानें ) 'का बरें' तें सांगतों. पण ती बाई कोठें आहे ती दाखीव अगोदर.

**ब्राह्मण**–खोलींत निजली आहे, पण तिनें कांहीं केलें नाहीं.

**जमादार**–तिनें नाहीं केलें तूं केलेंस (शिपायास) ह्याला परेज करा- (घरांत शिरतो व गंगूबाईस) बाई, तुह्मीं बाळंत होऊन किती दिवस झाले?

**गंगू**–कां बरं?

**जमादार**–'का बरें' विचारण्यास शरम नाहीं वाटत? तुमचें तान्हें मूल तुह्मीं मारून गटारात फेंकून दिलें त्या-वेळीं विचार नाहीं केला? बालहत्या कोणी केली, तुह्मीं कीं दुसऱ्यानें? बोला लवकर.

**गंगू**–जमादार साहेब मीं तुमच्या पायां पडतें. मला एवढा गुन्हा माफ करा. मी पुनः असें कधीं देखील करणार नाहीं.

**जमादार**–माझ्या हातांत काय आहे बाई? थोरल्या साहेबाच्या हुकमाप्रमाणें आह्माला वागलें पाहिजे. बरें पण, गुन्हा कोणी केला सांगा पाहूं अगोदर.

**गंगू**–(नावें सांगते व जमादार त्यास एकदम पकडण्याचा हुकूम करितो.)

**जमादार**–बाई, असल्या हलक्या लोकांच्या नादीं लागून तुह्मीं आपल्या अब्रूची खराबी करून घेतलीत. चला आतां आमच्याबरोबर. (शिपायास मेणा आणण्यास हुकूम करितो व गंगूला त्यांत बसवून चौकींत पोंहचवितात)

## प्रवेश दुसरा.

स्थळ–रस्ता.

**विसाजीपंत**–( प्रवेश करून ) काय ही आह्मां ब्राह्मण लोकांत दुष्ट चाल पडली असेल ती असो. ह्या एका कन्याविक्रयापासून किती अनर्थ ओढवतात. आता ह्या हरभटाच्या पोरीनें करावें तरी काय ? मुलगी सुस्वरूप असून तारुण्यावस्थेंत आली असतां पाऊणशें वर्षांच्या–ह्मणजे तिला आजोबा शोभेल अशा–पुरुषाशीं तिनें संसारसुख घ्यावयाचें ! त्यांतून स्वत पोरबुद्धि असून सल्लामसलत देणारीं माणसें बोलूनचालून हलकट. तेव्हा तिच्या हातून बालहत्येसारखीं अघोर कृत्यें घडलीं तर त्यात नवल तें कोणतें ? माझ्या मतें ह्या सर्व कृत्याचा दोष तिच्या निर्दय आईबापांकडेसच आहे. तेव्हां वस्तुत. अशा कृत्याबद्दल जर कांहीं शिक्षा होणें योग्य असेल तर ती तिच्या बापासच झाली पाहिजे. आज आमच्या देशात अशीं उदाहरणें पाहूं गेलें तर बरींच मिळतील व त्यांतून जीं थोडींबहुत उजेडास येतात त्या प्रत्येक खटल्यांत जर मुलीच्या बापास शिक्षा होत जाईल तर मला वाटतें, ही चाल हां हां ह्मणता नाहींशी होईल. असो. असा दिवस येईल तो सुदीन समजावयाचा. पण आमचे लोक विचार करतील तर सगळ्या गोष्टी ! अरेरे ! पण जिच्या अंगाला हात लावण्याला इतरांची प्राज्ञा नव्हती त्याच गंगूच्या एका

अघोर कृत्याबद्दल पोलिसानें कसे तिचे हाल केले! पोलिस चौक्या काय, आणि माजिस्त्रेट कोर्ट काय, ह्मणजे हिकडून तिकडे आणि तिकडून हिकडे असें करकरून त्या बिचारीला बेदम करून सोडलें. एवढेंही करून प्रकरणाचा निकाल येथेंच लागला असता तरी ठीक होतें, पण नशिबीचे हाल कोठें चुकले आहेत! माजिस्ट्रेटनें प्रकरण सेशनपर्यंत लावविलें आणि तेंही आजच आहे, तेव्हा काय निकाल लागतो हें पाहण्याकरिता आपण तिकडेसच जावें हें ठीक. अरे हो पण, सदाशिवराव व गंगूभाऊ येणार होते त्यानाही बरोबर घेऊन मग जावें. (जातो)

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—सेशन कोर्ट

(कचेरीत लोक बसले आहेत, कोणी कागद तपासीत आहेत, कोणी एकमेकाच्या कानाला लागताहेत, कोणी येणाऱ्या खटल्याचा काय निकाल होईल ह्मणून आपापसात भवतिनभवति करित आहेत, इतक्यात जजाची स्वारी प्रवेश करिते व सर्वजण उठून उभे राहतात व क्लार्कऑफधिकोर्ट जज्याकडे खटल्याचे कागद ठेवितो)

**जज्**—(कागद पाहून) ओ हो. आजचा मुकद्दमा फार महत्वाचा आहे. ह्याची फार बारकाईनें चौकशी केली पाहिजे. (इतक्यात आरोपीचा वकील जज्यापुढें केस मांडतो)

**सरकारतर्फे ब्यारिस्टर**—खुदावत, ह्या खटल्याची

हकिकत थोडक्यात अशी आहे. निशाणी नं. २ ची आरोपी ठमाबाई हिनें दामोदरपंत नांवाच्या गृहस्थाच्या विधवेस फूस लावून बाहेर काढली व तिला दुष्कर्माच्या मार्गास लाविलें. तिनें आरोपी निशाणी नं. ३ (गोविंदराव) ह्याच्या मदतीनें निशाणी न. १ च्या आरोपीकडून तिच्या तान्ह्या बालकाची हत्या करविली त्यामुळें एक निरपराधी प्राणी उगाच प्राणास मुकला. करिता कोर्टास माझी अशी विनती आहे कीं ह्या खटल्याचा चांगला बारकाईनें विचार होऊन आरोपी यांस यथायोग्य शिक्षा झाली पाहिजे. ( बसतो )

**आरोपीतर्फे ब्यारिस्टर**—खुदावत, ह्या खटल्यांत माझी कुळें अगदीं निरपराधी आहेत असें मीं आता आपणास दाखविणार आहे. हा खटला शुद्ध मत्सर व हेवा त्याच्यामुळें उपस्थित झाला आहे. करिता ह्या खट-ल्याच्या संबंधानें कोर्ट मेहर नजर ठेवील अशी मी आशा करितों.

**जज्य**—ह्या खटल्याचें स्वरूप इतकें भयंकर आहे म्हणून आरोपींच्या जबान्या ह्या कोर्टासमोर पुन्हा झाल्या पाहिजेत. ( शिपाई गंगूबाईच्या नावानें पुकारतो व दुसरे शिपाई तिला पिंजऱ्यात उभी करितात ) शपथ वगैरे झाल्यावर—

**ब्यारिस्टर**—तुमचें नांव काय?

**गंगू**—माझें नांव गंगू.

**ब्यारिस्टर**—तुमचें वय किती आहे?

गंगू—असेल पंधरा अगर सोळा.

ब्यारिस्टर—तुमच्या नवऱ्याचें नांव काय?

गंगू—( लाजून मान खालीं घालते, कोर्टांत हशा पिकतो. )

ब्यारिस्टर—तुमच्या नवऱ्याचें नाव दामोदरपंत?

गंगू—होय तेंच.

ब्यारिस्टर—तुमचें लग्न होऊन किती वर्षे झालीं?

गंगू—झालीं असतील दोन तीन वर्षे.

ब्यारिस्टर—तितक्या वेळात तुह्मीं नवऱ्याचे घरीं राहत होता?

गंगू—होय. तेथेंच राहत होतें.?

ब्यारिस्टर -तुमचा नवरा मरून आज किती दिवस झाले?

गंगू—सुमारें एक वर्ष.

ब्यारिस्टर—नवरा मेल्यादिवसापासुन तुमच्या परिचयाचीं माणसें कोण होतीं?

गंगू—गोविंदराव व ठमी.

ब्यारिस्टर—तुह्मीं आपल्या तान्ह्या बालकास मारल्याचा आरोप तुमच्यावर आहे तो खरा आहे काय?

गंगू—मी स्वतां होऊन मारलें, नाहीं.

( उलट तपासणी )

सर. तर्फे ब्यारिस्टर—तुह्मीं गोविंदराव व ठमाबाई ह्यास ओळखता?

गंगू—होय.

ब्यारिस्टर—त्यांची व तुमची आज किती वर्षांची ओळख आहे?

गंगू—सुमारें चार वर्षें.

ब्यारिस्टर—गोविंदराव, हा कोण आहे हें तुह्मांला ठाऊक आहे?

गंगू—होय तो माझ्या बापाकडे नेहमीं येत असे.

ब्यारिस्टर—तुह्मीं आपल्या तान्ह्या बालकाला कां मारलें हें सांगूं शकाल काय?

गंगू—लज्जेमुळें.

ब्यारिस्टर—तुमचें तान्हें मूल मारण्यास तुह्मांला कोणीं सांगितलें?

गंगू—ठमी व गोविंदा.

( नंतर दुभाषी गंगूस खालीं उतरण्यास सांगून ठमाबाईस हाक मारण्यास सांगतो. ठमी बारमध्यें उभी राहून शपथ वगैरे झाल्यावर )

ब्यारिस्टर—तुमचें नांव काय?

ठमा—मला ठमी ह्मणतात.

ब्यारिस्टर—ह्या खटल्यासंबंधानें तुह्माला काय माहिती आहे ती सर्व कोर्टापुढें खरी खरी सांगा.

ठमा—मी गंगूच्या बापाच्या घरीं जात येत असतें. गोविंदरावाची व माझी दोस्ती आहे. गोविंदराव व मी मिळून गंगूचें लग्न जुळवलें.

ब्यारिस्टर—बरं मग! गंगूला वाईट मार्गाला लावण्याचें काम कोणी पत्करलें?

ठमा—तें मला काय ठाऊक?

**ब्यारिस्टर**—तुह्मीं व गोविंदराव मिळून दोघांनीं गंगूला दुराचरणाला लावलें कीं नाहीं? खबरदार खोटें बोलाल तर!

**ठमा**— ( मान खालीं घालते )

**ब्यारिस्टर**—असें करण्याचा तुमचा हेतू काय होता?

**ठमा**—तिला कांहीं तरी संसारसुख मिळावं व तिचा व आमचा चरितार्थ चालावा हाच उद्देश.

**ब्यारिस्टर**—आजपर्यंत अशा किती बाया तुह्मीं बाहेर काढल्या बर?

**प्रतिवादितर्फे ब्यारिस्टर**—ह्या प्रश्नाला माझी हरकत आहे.

**सरकारतर्फे ब्यारिस्टर**—बरं गंगूचें तान्हे मूल तिच्या कडून का मारविलें?

**ठमा**—लोकात गवगवा होऊं नये ह्मणून. ( ठमा जाते ) व शिपाई गोविंदरावाला पुकारतात व त्याला ते बारमध्यें आणून उभें करतात. ( शपथ वगैरे झाल्यावर )

**ब्यारिस्टर**—तुमचें नांव काय?

**गोविंद**—गोविंद रामचंद्र तर्कटे. ( कोर्टांत हशा )

**ब्यारिस्टर**—तुह्मीं काय धंदा करतां?

**गोविंद**—भिक्षुकी.

**ब्यारिस्टर**—तुह्मीं भिक्षुकीशिवाय दुसरा कांहीं धंदा करीत असता कीं नाहीं?

**गोविंद**—नाहीं.

ब्यारिस्टर—खबरदार, खोटें सांगाल तर. तुह्मीं दुसरा कोणताच धंदा करीत नाहीं?

गोविंद—नाहीं. पण, कोणी काहीं काम सांगितलें तर तें भिक्षुकीच्या नात्यानें करावें लागतें.

ब्यारिस्टर—हें माझ्या प्रश्नाचें उत्तर नव्हे. मीं विचारतों त्याचें बरोबर उत्तर पाहिजे.

गोविंद—होय मीं बरोबरच उत्तर देतों.

ब्यारिस्टर—गंगूला तुह्मीं ओळखतां?

गोविंद—होय, ओळखतों.

ब्यारिस्टर—केव्हांपासून ओळखतां.?

गोविंद—आज बरेच दिवस झाले.

ब्यारिस्टर—प्रथम ओळख केव्हां झाली.

गोविंद—बरोबर आठवण नाहीं.

ब्यारिस्टर—गगूंचें लग्न तुह्मीं जुळविलेंत?

गोविंद—होय.

ब्यारिस्टर—ह्या लग्न जुळविण्याच्या कामांत तुह्मांला बराच पैसा मिळाला असेल नाहीं बरें?

गोविंद—नाहीं, ह्मणण्यासारखा नाहीं. (हशा)

ब्यारिस्टर—तरी पण, एकंदर किती मिळाला?

गोविंद—मिळाले एकदरींत चार पाचशें रुपये.

ब्यारिस्टर—हा पैसा तुह्मांला दामोदरपंतानीं खुशीनें दिला काय?

गोविंद—मी त्याला भुलथापी देऊन त्याजपासून काढला.

**ब्यारिस्टर**—ठमाबाईची व तुमची ओळख आहे काय?

**गोविंद**—होय व तिची लग्न जमविण्याचें कामीं मला मदत होती.

**ब्यारिस्टर**—तिच्या मेहनतीबद्दल तिला तुह्मी कांहीं दिलें काय?

**गोविंद**—सगळे पांच रुपये दिले आहेत. ( हशा )

**ब्यारिस्टर**—गगूकडून तिच्या तान्ह्या बालकाची हत्या कोणी करविली?

**गोविंद**—तें मला ठाऊक नाहीं.

**ब्यारिस्टर**—पण बालहत्या करविण्याच्या कामीं तुह्मीं तिला सल्ला मसलत दिली कीं नाहीं?

**गोविंद**—होय दिली.

**ब्यारिस्टर**—मूल कोणी मारलें तें तुह्मी सांगूं शकाल काय?

**गोविंद**—मी पाहिलें नाहीं.

**ब्यारिस्टर**—बालहत्येचा हेतु काय होता बरं?

**गोविंद**—ह्या गोष्टीचा गांवांत गवगवा होऊं नये हाच.

( कोर्ट टिफिणीकारितां उठून जातें )

( जज्ज येतो व सर्वजण त्यास खडीताजीम देतात )

**सरकारतर्फे ब्यारिस्टर**—आज कोर्टापुढें झालेल्या पुराव्यावरून पाहता एवढें सिद्ध होतें कीं, तिन्ही आरोपींवर गुन्हा शाबित झाला आहे. आरोपी निशाणी १ हिजवर इंडियन पिनलकोड कलम ३१२ प्रमाणें व निशाणी २ व ३ ह्याजवर सदर्हु गुन्हा करण्यास मदत केल्याबद्दल

कलम १०९ प्रमाणें गुन्हा शाबित झाला आहे तरी त्यास कायद्याप्रमाणें शिक्षा होणें योग्य आहे.

**आरोपी तर्फे ब्यारिस्टर**—खुदावंत्, ह्या झालेल्या जबान्यावरून कोर्टाचे लक्षात येऊन चुकलेंच असेल कीं, यद्यपि आरोपी कायद्याच्या दृष्टीनें अपराधी ठरले जातील तरी ज्या उद्देशानें अपराध घडला गेला आहे तो उद्देश कोर्टानें लक्षांत वागविला पाहिजे. आरोपितांनीं हा अपराध केवळ एकमेकाच्या सांगीवरून केला आहे. आरोपी निशाणी न २ व ३ ह्याचा हा गुन्हा घडवून आणण्यात फक्त द्रव्यलोभ हाच उद्देश होता. तेव्हां कोर्ट मेहर नजर करून—माझ्या आशिलांस शिक्षा देणेंच असेल तर ती हलकी होईल अशी मी आशा करतों. आरोपी निशाणी गंगूबाई ही तर माझ्या दृष्टीनें अगदीं निरपराधी आहे. कारण ही गोष्ट तिच्याच हातून झाली आहे असें मानलें तरी ती तिनें स्वसंतोषानें केली आहे असें मुळींच नाहीं तर ठमा व गोविंदा ह्या उभयताच्या फुसलावणीनें ती हें कृत्य करण्यास प्रवृत्त झाली असावी. शिवाय तिची भरज्वानी असल्यामुळें तिचें वाकडे पाऊल पडलें ह्मणजे अर्थात् अल्लडपणानें हें दुष्ट कृत्य तिच्या हातून घडलें. तेव्हां कोर्टानें तिच्या वयाकडे अकलेकडे व विशेषत ब्राह्मणात पुनर्लग्न करण्याची मनाई आहे वगैरे गोष्टींवर नजर देऊन जें काय योग्य दिसेल तें करावें, पण त्यात आरोपी निशाणी न. १ गगूहिला माझ्या मतें तर निरपराधी समजून अगदींच सोडून दिली पाहिजे. (बसतो)

**जज्ज**—जुरींतील सद्गृहस्थहो, कोर्टापुढें आलेल्या खट-ल्यान तीन आरोपी आहेत. आरोपी निशाणी २ व ३ हे दलालीचा धंदा करीत असून त्यानीं आरोपी निशाणी १ हिला तिच्या नवऱ्याच्या मृत्यूनतर बाहेर काढून दुष्ट कर्मास प्रवृत्त करविलें. ही गोष्ट आपल्या ध्यानीं आलीच असेल. एकदर झालेल्या जबान्या ध्यानीं आणता असें दिसून येतें कीं, आरोपी निशाणी १ हिचा आपल्या तान्ह्या बालकास मारण्याचा हेतु मुळींच नव्हता, फक्त आरोपी निशाणी २ व ३ याच्या सागण्यावरून व आ-पली फटफजिती न होतां अब्रूचें रक्षण व्हावें ह्मणून हें दुष्ट कृत्य तिला करणें भाग पडलें. करिता तिचें वय वगैरे गोष्टी ध्यानीं आणून आरोपी निशाणी एक हिजला दोषमुक्त कराल अशी माझी खात्री आहे. आरोपी निशाणी २ व ३ ह्यास, सदर्हु कोडाचें कलम १०९ प्रमाणें निशाणी १ हिजला आपल्या तान्ह्यास मारण्यास प्रवृत्त करवून त्या कामीं तिला मदत केली ह्मणून त्यास काहीं शिक्षा असणें अवश्य आहे.

**जुरींतील फोरमन**—ह्या खटल्यासंबधीं जुरीचें असें मत आहे कीं, आरोपी निशाणी १ ही निर्दोष आहे. व आरोपी नि० २ व ३ हे सदोष आहेत.

**जज्ज**—आरोपी नि० १ ही निर्दोष असल्यामुळें तिला सोडून दिली आहे व आरोपी नि० २ व ३ हे दोषी अ-सल्यामुळे त्यास सदर्हु कलमान्वयें प्रत्येकीं तीन तीन वर्षीची साध्या कैदेची शिक्षा केली आहे—(कोर्ट उठतें.)

## प्रवेश चवथा.

---

**स्थळ**–हरभटजींचें घर

**पात्रें**–हरभट

**हरभट**–हर हर! माझ्यासारखा पापी व द्रव्यलोभी ह्या दुनयेंत दुसरा कोणी मिळणार नाहीं. मी द्रव्यलोभानें केवढा अविचार केला! माझ्या पोटचा गोळा मी कसाया-सारखा विकून आपल्या नांवाला–माझें कसलें नाव ह्मणा-एवढेंच नाहीं तर माझ्या कुळाच्या नावालाही ही ज-न्माचा कळक लावून घेतला. ह्या माझ्या अविचारीपणामुळें मीं आपल्या एकुलत्या एक पोरीच्याही जन्माचें मातेरें करून टाकलें. त्यामुळें सहजच ती माझ्या नावानें आता धोंडे फोडील. मला घरातूनही वारंवार सांगणें होई कीं, पैशाच्या लोभाकरिता नकाहो आपली पोर ह्मातान्याच्या पदरी बांधूं पण तें मी तिचें ह्मणणें मुळींच ऐकलें नाहीं. आता पश्चात्ताप करून तरी काय उपयोग? सर्वस्वीं तिच्या नाशाला कारण मीच झालों. मीच जर तिला कसायासारखें विकलें नसतें तर तिजवर तरी आज हा प्रसंग कां गुजरला असता! शिव शिव! एक द्रव्यलोभानें एवढा अनर्थ ओढवला ना? आता पुढें तिची काय अवस्था होईल! तिला आतां आश्रय कोणाचा मिळेल? माझे गंगू बये आतां तूं जी मला शिक्षा करशील तिला मी पात्र आहे. त्या ठमीनें व गोंद्यानें कशी तुला भुरळ घातली व वाईट मार्गाला ला-

वण्याचा उद्योग केला, व शेवटीं तुला दुःखसागरांत ढकलून दिलें! आता शेवटीं माझ्या मित्रांस जे माझ्यासारखे अमाच मूर्खपणा करीत असतील त्यास एवढीच विनती आहे कीं, त्यानीं आपल्या कन्येचा पैसा घेऊन तिला दुःखसागरांत टाकू नये व त्या जगन्नियत्यानें कोणासच अशी दुष्ट बुद्धि देऊं नये. मी केलेल्या मूर्खपणाबद्दल आज मला पूर्ण पश्चात्ताप होत आहे. पण आतां त्याचा उपयोग काय? झाली गोष्ट परत येत नाहीं. असो. ईशसत्ता बलवत्तर आहे. जातों आतां दक्षिणेचें आमंत्रण आहे तेथें गेलें पाहिजे. (जातो)

समाप्त.

# व्याख्यान.

न कन्यायाः पिता विद्वान् गृह्णीयात् शुल्कमण्वपि ।
गृह्णञ्छुल्कं हि लोभेन स्यान्नरोऽपत्यविक्रयी ॥ मनु०

आपल्या देशात कन्याविक्रय करण्याची दुष्ट चाल जी आज कित्येक वर्षें पडून गेली आहे त्या चालीचें कोणत्या रीतीनें निवारण होईल व आमच्या अनाथ भगिनी कोणत्या रीतीनें सुखात पडतील ह्याविषयीं आज थोडासा विचार करू.

प्रथमत ही चाल उच्च वर्णांत पडली असावी. पण, ती केव्हां व का पडली ह्याविषयीं जरी काहीं निश्चयात्मक सांगता येत नाहीं तरी, ती फार प्राचीन असावी असें अनुमान करता येतें. आपल्या देशातील पूर्वीची लग्नपद्धति पाहू गेलें तर फारच प्रशंसनीय होती, ह्मणजे कन्येनें वयात आल्यावर आपल्या योग्यतेनुरूप पति पाहून त्याजबरोबर विवाह करावा. ह्या बद्दल मुळींच संशय नाहीं. दमयंती, सीता, द्रौपदी वगैरे सन्माननीय स्त्रिया आज ह्या गोष्टीची साक्ष देत आहेत. विवाहाचे वेळीं मुलींस उद्देशून जे मंत्र ह्मटले जातात त्यावरून मुली प्रौढ वयाच्या असल्या पाहिजेत हें उघड आहे. कित्येक सूत्रातून वधुवरानीं काहीं दिवसपर्यंत एके ठिकाणीं राहू नये अशी आज्ञा आहे. कित्येक सूत्रकार तर असें ह्मणतात कीं, स्त्रीपुरुषाचा लग्नाच्या चवथे दिवशीं संयोग व्हावा. ह्या

वरूनच लग्नाच्या वेळीं मुलगी प्रौढ वयाची असली पाहिजे हें सिद्ध होतें. आश्वलायन व आपस्तंब ह्यानीं जरी वधूच्या वयाचा मुळींच निर्देश केलेला नाहीं तरी, हिरण्यकेशी व जैमिनी ह्यांनीं अप्रौढवधुविवाहाचा उघडपणें निषेध केला आहे. गोभिल आदिकरून सूत्रकारानीं नग्निका ह्मणजे अप्राप्तयौवन अशी वधु विवाहास योग्य होय असें प्रतिपादन केलें आहे. बालविवाहास येथूनच आरंभ झाला ह्मणावयाचा. पुढें कालचक्र फिरून आमच्या देशावर अनेक परकियानीं स्वाऱ्या केल्या व आमच्या देशास जर्जर करून सोडलें, त्यावेळीं त्या कालाला अनुसरून आमच्यातील बहुतेक जुन्या चालींचा लोप होऊन नव्या चाली प्रचारात आल्या. त्यातच कन्याविक्रय करून उदरनिर्वाहाची चाल आमच्यात आली असावी, असें साधारणपणें अनुमान करण्यास जागा आहे. व ह्या दुष्ट चालीचा आज मितीस इतका फैलावा झाला आहे कीं, तिचा अंगिकार करण्यास कोणासही विधिनिषेध वाटत नाहीं. वाटेल त्यानें उठावें, शेंकड्यावरी मुलीचे पैसे घ्यावे व गरजवंतानें ते द्यावें. शिव शिव! असलें दुष्ट कर्म करणारे लोक असा विचार करीत नाहींत कीं, आह्मी नरकाचें साधन करीत आहोंत. बरें. ह्या रीतीनें केलेली बायको विध्युक्त होते कीं काय हें आपण आता पाहू. मनूनें ह्मटलें आहे.

॥ क्रयक्रीता च या कन्या पत्नी सा न विधीयते ।

ह्मणजे अर्थात् पैसा देऊन विकत घेतलेली बायको विध्युक्त बायको होत नाहीं. तर ती केवळ विकत घेतलेली दासी होय. त्यामुळें ती कोणत्याही शुभकर्माला उपयोगी पडत नाहीं व तिचें केलेलें कन्यादान मुळींच होत नाहीं.

बहुत कालापासून आमच्या देशांत आठ प्रकारचे विवाह प्रचारात आहेत. ते येणें प्रमाणेः—

ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथाऽऽसुरः ।
गांधर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥

ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस आणि पैशाच. हे आठ प्रकार.

१ **ब्राह्म**—विवाह ह्मणजे जात्यादि गुणानीं युक्त अशा वराला सालंकृत करून कन्या देणें.

२ **दैव**—विवाह ह्मणजे यज्ञाच्यावेळीं ऋत्विजाला अलंकारसहित कन्या अर्पण करणें

३ **आर्ष**—विवाह ह्मणजे गुणवान विद्वान आणि योग्य अशा वरापासून दोन गाई अथवा दोन बैल घेऊन कन्या देणें.

४ **प्राजापत्य**—विवाह ह्मणजे कन्येचा जो धर्म असतो तो पाळून तू तिजबरोबर रहावें असें सांगून कन्यादान करणें.

५ **आसुर**—विवाह ह्मणजे अमुक द्रव्य द्या असें सांगून कन्या देणें.

६ **गांधर्व**—विवाह ह्मणजे वधुवरानीं परस्पराच्या प्रीतीनें जो विवाह करणें तो.

७ **राक्षस**—विवाह ह्मणजे युद्ध करून कन्येचें बलात्कारानें हरण करणें

८ **पैशाच**—विवाह ह्मणजे निद्रावस्थेंत असतां अथवा मोहनी घालून कपटानें कन्येचें हरण करणें.

आता विचार करून पहा कीं, वर सांगितलेल्या पांचव्या प्रकारच्या विवाहाची किती योग्यता कमी आहे! पहिल्या प्रकारचा विवाह ब्राह्मणामध्यें उत्तम धरला आहे. ब्राह्म, दैव आर्ष, प्राजापत्य, आणि गांधर्व हे पाच प्रकारचे विवाह क्षत्रिय आणि वैश्य ह्यांना उत्तम धरले आहेत. आणि बाकीचे तीन प्रकार अधमाधम मानले आहेत, ह्मणजे ते शुद्रादिक किंवा त्याहीपेक्षा अधम जे अत्यज त्यांसही योग्य नाहींत. असें असता असल्या प्रकारचे विवाह आह्मा श्रेष्ठ ह्मणविणाऱ्या ब्राह्मणादि जातींत चालू असणें ही किती लाज आणणारी गोष्ट आहे! त्यातून '**पैशाचश्चासुरश्चैव न कर्तव्योकदाच न**' असें ह्मटलें आहे. ह्मणजे हे दोन प्रकारचे विवाह अति निंद्य मानले गेले आहेत. व तेच जर आमच्या लोकात जारीनें चालू आहेत तर प्रजा तरी चांगली कशी निपजावी? वाईट गोष्टीचा परिणाम वाईट होतो हें कोणालाही सांगावयास नको. विवाह ह्मणजे प्रीतीचें बंधन. तेव्हा अशा प्रकारें विकत घेतलेल्या मनुष्यावर किती प्रीती रहिणार बरें? पण हें तत्व ज्याना पैशावाचून दुसरें कांहीं दिसत नाहीं त्याना कोठून कळणार? मुलीचें कांहीं का होईना! त्याची तुंबडी भरली

ग्रंथ

ह्मणजे झालें. मुलीला काय? द्यावी तिथें जाणार. यद्यपि आमच्यात गांधर्वादि उत्तम विवाहाच्या चाली होत्या तथापि बहुतेक सर्व गोष्टी आईबापाच्या मर्जीनुरूप व्हावयाच्या. आणि त्यांत तर त्या चाली आता मुळींच बंद पडल्या. तेव्हां बाप देईल तेथें मुलीला जाणें भाग! गुजराथींत ह्मण आहे 'डिकरी ने गाय दोरे त्या जाय' अशी जेथें स्थिति आहे, तेथें मुलाच्या विद्येकडे शीलाकडे व गुणांकडे कोण पाहतो? एवंच मुली देणें हें आईबापांच्या मर्जीची गोष्ट झाली आहे. मुली देणें ह्याला कन्यादान करणें ह्मणतात. तेव्हा आता आपण कन्यादानाविषयीं थोडासा विचार करूं.

'दान' ह्मणजे कोणत्याही पदार्थावरून आपली सत्ता निवृत्ति करून तो पदार्थ दुसऱ्यास देणें. ह्या दान शब्दामध्यें धर्मसंबंध असल्यामुळें दात्यास पारलौकिक सुखप्राप्ति होते असा लोकाचा समज आज फार प्राचीन काळापासून त्या शब्दाबद्दल होऊन बसला आहे. तेव्हा दान करण्याला—मग ती कोणतीही जिन्नस असो—तिजवर दान करण्यापूर्वी दात्याची पूर्ण सत्ता असली पाहिजे हें उघड आहे. पण ज्या वस्तूची किंमत आपण घेतली तिचें दान करण्याचा अधिकार आपणास कसा पोंहचेल? ह्यावरून आपणां सर्वांच्या लक्षात येऊन चुकलेंच असेल कीं ज्या कन्येचा पैसा घेतला जातो त्या कन्येच्या बापास तिचें दान करण्याचा अधिकार मुळींच पोंहचत नाहीं. तेव्हां

अशा तऱ्हेनें केलेलें कन्यादान विध्युक्त होत नाहीं हें उघड झालें. आणि हें जर कन्यादान होत नाहीं, तर त्यापासून मानलेली फलप्राप्ति तरी कशी होईल ह्याचा विचार सभ्यजनानींच करावा. एक कन्यादान करणें ह्मणजे पृथ्वी दान करण्यासारखें होय, येवढें ह्या दानाचें पुण्य व महत्व मानलें गेलें आहे, तर तें पुण्य व महत्व बाजारातील एखाद्या सामान्य सौद्याप्रमाणें विकलेल्या कन्येच्या दानापासून होईल काय? अशा ठिकाणीं ‘ दान ’ ह्या शब्दाचा उपयोग करण्याससुद्धा मोठी शरम वाटते. असो. ह्या संसारांत स्त्री ही मनुष्यास सुख देणारी मुख्य वस्तु आहे. ह्मणूनच आमच्या सूज्ञ पूर्वजानी तिला ‘ गृहिणी ’ हें पद लावलें आहे. गृहिणीवाचून गृहस्थाश्रमच नव्हे. ह्मटलें आहे:-

न गृह गृहमित्याहु गृहिणी गृहमुच्यते ।
गृहंच गृहिणी हीन मरण सदृश विदु ॥

ही योग्यता विकत घेतलेल्या बायकोला येणार आहे काय? कधीं येणार नाहीं. गृहिणी ह्मटली ह्मणजे सर्व घराचा भार तिच्यावर राहतो. नवऱ्याच्या सुखासमाधानाच्या वेळीं ती त्यास आपल्या कृतीनें सुख देते; संकटसमयीं बुद्धिवाद सागून त्यास नेहमीं आनंदी ठेवते; आल्या गेल्याचा चागला आदरसत्कार करते व हा संसारशकट चालविण्यास ती मोठ्या आस्थेनें आपल्या नवऱ्यास मदत करिते. अशी जी गृहिणीची योग्यता ती विकत घेतलेल्या बटकी सदृश बायकोला येईल काय?

कन्येचा विक्रय करून तिच्यावर आपला उदरनिर्वाह करून तिला गृहिणीच्या पदापासून दूर करणारा जो

दुष्ट बाप त्या बापास ती दुवा देते काय? दुव्याची गोष्ट लांबच राहिली. पण तिचे अभिश्राप मात्र त्याला नडतात आधींच पैसा धुवून नेलेला त्यात नवऱ्याचें म्हातारपण ( आतां मी येथें असें म्हणत नाहीं कीं सर्वच नवरे म्हातारे असतात ) लग्नाला लागलेल्या पैशांचें कर्ज व वर मृत्यूची धाड ह्याप्रमाणें सर्व सोयी झाल्या कीं कांहीं थोडें बहुत असल्यास तें सावकार घेऊन जातो व ही विधवा होऊन कोठें तरीं हातीं पोळपाट लाटणें घेऊन फिरते; कधीं पोटभर अन्न मिळतें, कधीं दोन दिवस उपासांनेंही निघतात. त्यांतून सदाचारी असली तर ठिकच, नाहीं तर कचऱ्याची पेटी व गटारें ही द्वारें मोकळीं राहातात! तर हा एवढा प्रकार कशानें बरें झाला? तर एका बापाच्या पैसा घेण्यानें!

कन्याप्येव पालनीया, शिक्षणीयातियत्नत ।
देया वराय विदुषे धनरत्नं समन्विता ।।

कन्येचें मुलासारखें पाळण करणें, तिला सुशिक्षण देणें व चांगला धनसंपन्न व विद्वान असा वर पाहून त्याला तिचे दान करणें. अहाहा! हे नियम केवढे सुखकारक व आनंदजनक आहेत? पण, आह्मीं तर आजमितिला त्याच्या उलट वर्तन करीत आहोंत. अन्नवस्त्रादि देऊन मुलीला कसें तरी वाढवावें लगितेंच पण, तिच्या शिक्षणाकडे आह्मीं मुळींच दुर्लक्ष करितों. व तिच्या रक्षणाच्या उलट तिचें 'भक्षण' करितों असें ह्मटलें तरी चालेल. कारण, मुलीचा जेवढा अधिक पैसा मिळेल तेवढा काढावा अशी आमची इच्छा. हरहर! किती निचावस्था ही.

गायत्री हरते पाप, त्र्यंबकेनायुर्वर्द्धते ।
उभय रुद्रजाप्येन, न कन्याहय विक्रयै ।।

गायत्रीचा जप केल्यानें पापाचा क्षय होतो, मृत्युंजयाच्या जपानें आयुष्य वाढतें, रुद्राचा जप केल्यानें वरील दोन्हींचें पुण्य पदरीं पडतें, परंतु ह्या सदरील तिन्ही मन्त्राच्या जपानें कन्या व हय विक्रयाचें पाप कधींही जात नाहीं; मग तुह्मीं दानधर्म करा, तीर्थयात्रा करा, यज्ञयागादि करा कीं, पाहिजे तें करा, पण तें पाप ह्मणून कधींही जावयाचें नाहीं. ह्या पापाच्या योगानें घेतलेलें द्रव्य जातें तें जातेंच. पण, तें त्याच्याबरोबर आपणाजवळ असलेलें द्रव्यही नाहींसें करितें व तें घेणारा भिकारी होऊन दुष्टकर्में करण्यास प्रवृत्त होतो. व सरशेवटीं त्यास नरकवास आहे तो आहेच. इतकी दुर्दशा एका कन्याविक्रयाच्या पायीं होते.

गृहिणी ही यज्ञयागादि कर्मास अवश्य लागते व तिजवाचून त्याची सिद्धिहि होत नाहीं. ती पुरुषाच्या सुखदुःखाला भागीदार असते व पुरुषाचे सर्वसुख तिच्यावर अवलंबून असतें ह्मणून स्त्रियास त्याचा योग्य मान देणें हें प्रत्येक पुरुषाचें कर्तव्यकर्म आहे. ह्मटलें आहे.

यत्रनार्यस्तु पूज्यते रमते तत्रदेवता

नाहीं तर ज्या घरात स्त्री नेहमीं शोकाकूल राहील त्या कुटुंबाचा निश्चयेंकरून नाश झाल्यावाचून राहत नाहीं व ज्या कुटुंबात स्त्रियास सुख मिळतें तें कुटुंब नेहमीं वाढतें राहून निरतर आनंदानुभव घेईल. करिता प्रत्येक मनुष्यानें आपल्या कुटुंबांत नेहमीं शांति राहील अशा रीतीनें वर्तन करावें. कारण ह्मटलें आहे:—

संतुष्टो भार्यया भर्त्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्य कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥

ज्या कुळांत स्त्रीपासून भर्ता संतुष्ट होतो. तशीच स्त्री पतीपासून संतुष्ट होते त्या कुळात सर्वकाळ निश्चयेंकरून कल्याण राहतें.

सर्व वर्णांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ गणला गेला आहे, तो सर्व वर्णांचा गुरु आहे. धर्मरूपी भांडाराचें रक्षण त्याजकडे असतें. अशी ज्या ब्राह्मणाची योग्यता त्या ब्राह्मणानेंच जर कन्याविक्रयासारखीं अघोर कृत्यें केलीं व आपल्या अधिकाराला पराङ्मुख झाला तर त्याचें अनुकरण इतर लोकानीं केल्यास त्यात मोठेंसें नवल नाहीं.

कन्याविक्रय करून त्या पैशावर आपला चरितार्थ चालविणारा पुरुष अधम मानला आहे, हें आता वरील विवेचनावरून सर्वांचे लक्षात येऊन चुकलेंच असेल, तरी पण, कित्येक असें ह्मणतात कीं आम्हीं जो पैसा घेतों तो आम्हीं आमच्या ससाराला मुळींच लावीत नाहीं तर, आम्हीं निर्धन असल्याकारणानें मुलीच्या लग्नकार्यादिकात लागणारा खर्च त्या पैशानें भागवितों. जर पैसा न घेऊ तर सोयरेधायऱ्यांस बोलावून त्याची तरतूद कशा रीतीनें आह्मास ठेवतां येईल? त्यास न बोलाविलें तर ते हसतील, जातीस जेवण तर दिलें पाहिजे! काय सबब ही! पोटच्या पोरीचा पैसा घेऊन खर्च करण्याची लजत त्यास उत्तम साधली आहे!

पैसा घेण्यात त्याची अब्रू जात नाहीं, पण ती सोयरेधायऱ्यांस न बोलावण्यानें व जातीला जेवण न दिल्यानें जाते. अशा रितीनें अब्रू मिळविणारास लाज असो. जेवण मिळतें तोंपर्यंत ह्मणाले तर कदाचित् चागलें ह्मणतील पण तेच लोक त्याची निंदा करून त्यास हुंडीवाले वगैरे पदवी

देतात. व मुलीला सासरची माणसें हजारी, दीडहजारी वगैरे नावानें हाका मारून त्या बिचाऱ्या अबलेला जन्माचा डाग लागून शरम उत्पन्न होते, अशा वेळीं तिच्या मनाची स्थिति कशी होत असेल त्याची कल्पना आपल्यासारख्या सुज्ञ जनानींच करावी.

आता ही चाल प्रचारांत येण्यास साधारणपणें कोणती कारणें झालीं असावींत ह्याचा विचार करू.

१. कित्येक लहान जातींत मुली मुळींच मिळत नाहींत. त्यातून त्यात तटहा फार असतात. गात्राचीही फार अडचण पडते.

२. आळस वाढून लोक निरुद्योगी झाले व तेणेंकरून निर्धन होत चालले, त्यामुळें एका उत्पादक मनुष्यावर सर्व कुटुंबाचा भार पडून त्यास पुष्कळ निरुद्योगी मनुष्यास पोसावें लागतें.

३. पूर्वी आपले पूर्वज सधन होते व हल्लीं आह्मी निष्कांचन झालों तरी पण पूर्वजाचा डामडौल व चालीरीति राखल्याच पाहिजेत हा वेडा समज.

४. लग्नादि कार्यांत होणारा उधळा खर्च.

आता ही वरील दुष्ट चाल बंद करण्यास कोण कोणत्या उपायाची योजना केली असता तिचा प्रतिकार करतां येईल ह्याविषयीं मी दोन शब्द बोलून आपला वेळ न घेता माझें भाषण आटोपतें घेतां.

१ प्रत्येक जातांत जे निरनिराळे तट असतात ते प्रथमतः मोडले पाहिजेत

२. लोकाना विद्या शिकवून उद्योगास लावलें पाहिजे.

३. प्रत्येक मनुष्यानें दुसऱ्यावर अवलंबून न राहतां आपल्या निर्वाहास पुरेल इतका तरी पैसा मिळविला पाहिजे.

४. आपला आदा असेल त्याप्रमाणें खर्च केला पाहिजे.

५. प्रत्येक जातींत एक फंड उभा करून त्या फंडातून खरोखर गरीब असेल त्यास त्याच्या मुलीच्याच लग्नाकरितां फंडाच्या ऐपतीप्रमाणें मदत केली पाहिजे.

६. कन्याविक्रयी मनुष्याबरोबर कोणत्याही प्रकारचा व्यवहार न करण्याविषयींचा निर्बंध प्रत्येक जातीनें केला पाहिजे.

७. प्रत्येकानें आपला व आपल्या बायकोचा चरितार्थ यथास्थित चालवता येईल असें आपल्याजवळ साधन असल्यावाचून मुळींच लग्नकरण्याच्या भानगडींत पडूं नये.

येणेंप्रमाणें उपायाची योजना केली असता खरोखर काहीं दिवसानी ही दुष्ट चाल बंद पडेल अशी आशा आहे. ह्मणून प्रत्येक जातींतील जाणत्या, सधन व धार्मिक लोकानीं ही दुष्ट चाल बंद करण्यास आपणाकडून होतील ते उपाय योजून झटलें पाहिजे. अज्ञानी लोकांच्या समजुती घातल्या पाहिजेत व त्यांस ह्या विषयाची चांगली माहिती करून दिली पाहिजे, येवढेंच नव्हे तर, ह्या विषयावर वारवार भाषणें झालीं पाहिजेत तेव्हां कोठें हा विषय लोकाच्या मनांत भरेल. तो लोकाच्या मनात भरला ह्मणजे सहज हळुहळू ही दुष्ट चाल बंद पडेल ह्यात संशय नाहीं. कोणतीही नवी चाल प्रचारांत आणणें ह्मणजे ती एकदम आणतां येईल असें कधींही होणें नाहीं. त्या बाबतींत लोकाचा चांगला समज होऊन त्याच्या हृदयांत ती

गोष्ट बिघेल अशाच उपायाची निरंतर योजना करीत गेलें पाहिजे. पहा—आज ज्या अनेक सुधारणा आमच्या लोकांत होत चालल्या आहेत त्या कांहीं सर्वत्र एकदम झाल्या आहेत असें मुळींच नाहीं. सर्व क्रमाक्रमानेंच होत गेलें पाहिजे हा सृष्टि नियम आहे. तोच नियम सर्व लोकांस लागू पडतो..त्यांतून द्रव्य ही कांहीं अशी मोहक व अजब चीज आहे कीं कोणाही मनुष्यानें त्यावाचून चालायचेंच नाहीं. आणि तुह्मी तर कन्येचा पैसा घेऊं नका ह्मणता, तेव्हां हें कृत्य एकदम कसें बंद पडेल? अशा दुष्ट लोकास वर नमूद केलेल्या गोष्टींची चांगली ओळख करून दिली पाहिजे. पापपुण्याची भीति त्यास समजाऊन सांगितली पाहिजे. व्यावहारिक तोटे त्याच्या लक्षात भरवून दिले पाहिजेत. सधनानी अशा कृत्यांत होईल तर मदत करून अशा लोकास त्यांच्या दुष्ट कृत्यापासून पराङ्मुख केलें पाहिजे. शेवटीं सांगायचें ह्मणून येवढेंच कीं प्रत्येकानें यथाशक्त्या प्रयत्न करून ही दुष्ट चाल बंद करण्याच्या उपायाची योजना करण्यास आपली कंबर बांधून तनमनधनेंकरून झटलें पाहिजे.

हे वेडेवांकडे विचार थोडक्यात आपणापुढें ठेवले आहेत. दोषाकडे नजर न देता त्यांत सांगितलेल्या गोष्टीच्या तात्पर्यावर नजर देऊन गुण ग्रहण करून ही कन्याविक्रयाची चाल बंद करण्यास प्रयत्न करा. येवढी आपणासवास माझी विनति आहे.